आजचा रंग - लाल
लाल रंग हा प्रेमाचा रंग तर आहेच...
पण जोश आणि उल्हासाचाही
रंग हाच आहे.
या रंगाप्रमाणेच आपला
प्रेमळपणा अधिक वाढत जावो.
नवरात्रीच्या हार्दिक शुभेच्छा!

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | मंगळवार, दि. १७ ऑक्टोबर २०२३ | वर्ष : २२ वे | अंक : १९ वा | किंमत : ५ रुपये | पाने ८

## टिप्पर रिवर्स घेताना चाकाखाली चेंगरून तरुण ठार

**सोलापूर** : रस्ता दुरुस्तीचा टिप्पर रिव्हर्स घेताना मागच्या चाका खाली चेंगरून २५ वर्षीय मध्य प्रदेशचा मजूर जागीच ठार झाला. हा अपघात माळशिरस येथील (६१ फाटा,फुलेनगर ) येथे रविवारी पहाटे दीड वाजेच्या सुमारास घडला. संतोष कोमल चौधरी (वय २५ रा.पन्ना मध्यप्रदेश,सध्या रा.मांडवे ता.माळशिरस) असे मयताचे नाव आहे. तो जे.एम म्हेत्रे कंपनी मजूर म्हणून काम करीत होता. काल पहाटे दीड वाजेच्या सुमारास फुलेनगर येथील ६१ फाटा येथे रस्ता दुरुस्तीचे काम चालू होते. त्यावेळी तो टिप्परच्या पाठीमागे थांबून रस्ता दाखवीत होता. त्यावेळी हा अपघात घडला. या अपघाची फिर्याद मयताचे भाऊ राजकुमार चौधरी (रा.मध्यप्रदेश) यांनी माळशिरस पोलिसात दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी एमएच ४६-बीयु- ५१४१ या क्रमांकाचा टिप्पर चालक राजलालच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला.


# गवळ्यांचा दुधाऐवजी ‘ड्रग्ज’चा धंदा; दया नायक यांनी दाखवला कारवाईचा दंडा

## चिंचोळी एमआयडीसीतून ११६ कोटींचा ड्रग्जसाठा पकडला; सोलापुरातील दोघांना कोठडी

सुराज्य/विशेष प्रतिनिधी

**मुंबईहून गुन्हे अन्वेषण शाखेची टीम चिंचोळी एमआयडीसीत येते... बंद असलेल्या एका कारखान्यावर कोणतीही माया न दाखविता छापा टाकते... या छाप्यात ड्रग्जच्या वर्तुळात सर्वात किंमती म्हणून पाहिले जात असलेले एमडी ड्रग्ज पथकाच्या हाती लागते... ज्या पथकाचे नेतृत्व एन्काऊंटर स्पेशालिस्ट दया नायक करीत होते... त्यांनी त्या ठिकाणावर छापा टाकला, तेव्हा तेथे परंपरेत गवळी म्हटले की दुग्ध व्यवसाय कोणाच्याही नजरेसमोर येतो... पण या छाप्यात हाती लागलेले गवळी बंधू दुधाच्या धंद्याऐवजी परंपरेची चौकट मोडत बेकायदेशीर ड्रग्जचा धंदा करीत असल्याच्या प्रकाराने सोलापूर शहर आणि जिल्ह्याला अचंबित केले आहे. या छाप्यात कच्चा आणि पक्का एमडी ड्रग्ज असा एकूण ११६ कोटी रुपयांचं घबाड गुन्हे अन्वेषण शाखेच्या नायकाच्या हाती लागलं आहे. ज्याकडे एन्काऊंटर स्पेशालिस्ट दया नायक यांनी दाखविला कायद्याचा दंडा म्हणून पाहिले जात आहे.**





मुंबईच्या गुन्हे अन्वेषण शाखेकडून सोलापुरातील मोहोळ तालुक्यातील चिंचोळी एमआयडीसीमधील एका बंद पडलेल्या कारखान्यामधून एमडी ड्रग्जचा सुमारे १६ कोटी १९ लाख रुपयांचा ८ किलो ९५ ग्रॅमचा ड्रग्जचा पक्का साठा रविवारी जप्त केला तर सुमारे १०० कोटींचा ५० ते ६० किलो कच्चा माल जप्त करण्यात आला आहे. दोन्ही मिळून सुमारे ११६ कोटींचा ड्रग्जचा साठा जप्त केल्यामुळे एकच खळबळ उडाली आहे. याप्रकरणी दोन्ही ताब्यात घेतलेले आरोपी सोलापूर शहरातील शिवाजीनगर बाळे गावचे रहिवाशी आहेत. एमआयडीसीमधील एका बंद पडलेल्या कारखान्यातून ड्रग्जचा गोरख धंदा चालत होता. हा कारखाना सील करण्यात आला आहे. मुंबईत खार येथे ड्रग्ज विक्रीसाठी आलेल्या सोलापुरातील बाळे गावचे रहिवाशी असलेले राहुल किसन गवळी आणि अतुल किसन गवळी या सख्या भावांना एन्काउंटर स्पेशालिस्ट दया नायक यांच्या नेतृत्वाखालील पथकाने कारवाई करून ताब्यात घेतले होते. त्यावेळी दोघा भावंडांकडून १० कोटी २० लाख रुपयांचे मेफेड्रीन जप्त करण्यात आले होते. पोलिसांनी या दोघांना अटक करून न्यायालयासमोर उभे केले असता त्यांना १९ ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडी देण्यात आली होती. तपासात या दोघांनी सोलापुरातील चिंचोळी येथे कारखाना उघडल्याचे सांगितले होते. स.पो.नि. महेंद्र पाटील यांच्याकडे या प्रकरणाचा तपास आहे. त्यानुसार मुंबईच्या गुन्हे शाखेच्या ९ नंबर पथकाकडून सोलापुरातल्या मोहोळ तालुक्यातील चिंचोळी एमआयडीसी येथे रविवारी छापा टाकण्यात आला.ज्यामध्ये १०० कोटींचा कच्चा माल मिळून आला.

### चिंचोली एमआयडीसी पुन्हा चर्चेत

सोलापुरातील याच चिंचोळी एमआयडीसी परिसरातील एऑन लाईफ सायन्सेस नावाच्या कंपनीमध्ये २०१६ साली अशाच पद्धतीने ठाणे गुन्हे शाखेने कारवाई करत येथे ड्रग्सचा पर्दाफाश केला होता. त्यावेळी देखील १८ हजार किलो इफेड्रीन ठाणे गुन्हे शाखेकडून जप्त करण्यात आले होते, त्यावेळी ममता कुलकर्णी आणि तिचा प्रियकर विकी गोस्वामी हे आरोपी होत्र. त्यानंतर आता पुन्हा अशीच कारवाई करण्यात आली आहे. मागील काही दिवसांपासून राज्यात अनेक ठिकाणी ड्रग्सवर कारवाई करण्यात येत आहे.

### अनेक प्रश्न अनुत्तरीत

सोलापुरातील बाळे गावचे रहिवाशी असलेले राहुल किसन गवळी आणि अतुल किसन गवळी या सख्या भावांना एन्काउंटर स्पेशालिस्ट दया नायक यांच्या नेतृत्वाखालील पथकाने केलेल्या कारवाईत ताब्यात घेतले. गवळी बांधवांचा दुधाचा व्यवसाय असतो, मात्र या भावंडांनी ड्रग्जच्या व्यवसायात मोठी कमाई असल्याचे लक्षात घेऊन या धंद्यात पाऊल ठेवले होते. सामान्य माणूस बेकायदेशीर कामासाठी इतके मोठे धाडस करू शकतो, तेव्हा यामागे मोठी अज्ञात शक्ती कार्यरत आहे का यासह अनेक प्रश्न अनुत्तरीत आहे.

### बंद कारखाना भाडेतत्वावर घेतला

चिंचोळी एमआयडीसीमधील गेल्या अनेक वर्षापासून बंद असलेल्या या कंपनीत ड्रग्स निर्मिती सुरू असल्याची माहिती मुंबईच्या गुन्हे शाखेला मिळाली होती. या कारवाईमुळे सोलापुरात पुन्हा एकदा खळबळ उडाली आहे. सरकारने बंदी घातलेले एमडी हे केमिकल ड्रग्ज आरोग्यासाठी फार घातक मानले जाते. राहुल आणि अतुल हे दोघे सख्खे बंधू एका केमिकल कंपनीत काम करत होते. त्यानंतर त्यांनी चिंचोळी औद्योगिक वसाहतीत एक बंद पडलेला कारखाना महिना ३० हजार भाडेतत्वावर भाड्याने घेतला. त्यांनी अशिक्षित असे सुरक्षारक्षक प्रवेशद्वारांवर तैनात केले होते. त्यामुळे या कारखान्यात नेमके काय चालते याची त्यांना माहिती नव्हती.

### मुंबईतील ग्राहकांना पुरवत होते ड्रग्ज

या कारखान्याच्या माध्यमातून गवळी भावंडांनी केमिकलच्या अभ्यासातून त्यांनी ड्रग्जसाठी कच्चा माल तयार करायला सुरुवात केली. त्यातून ड्रग्ज तयार करून विक्रीतून बक्कळ पैसे मिळतात, हे लक्षात आल्यानंतर त्यांनी हा व्याप वाढवला. मुंबईत खास ग्राहक बघून त्यांना हे ड्रग्ज पुरविण्यात येत होते. अखेर मुंबई गुन्हे शाखेच्या पोलिसांनी त्यांना काही दिवसांपूर्वी ड्रग्जसह ताब्यात घेऊन चौकशी केली असता, हा मोठा प्रकार उघडकीस आला आहे.

# पालकमंत्र्यांचा पहिलाच दौरा दडपणाखाली; नको राडा म्हणून पोलिसांनी घातला गराडा

सुराज्य/सोलापूर



जिल्ह्याचे पालक असलेल्या चंद्रकांत पाटील यांचा सोलापुरातील पहिलाच दौरा दडपणाखाली आणि पोलिसांच्या गराड्यात पार पडला. असा नवा पायंडा नव्या पालकमंत्र्याकडून सोलापुरात पहिल्यांदाच पहावयास मिळाल्याची चर्चा दिवसभर सर्वत्र रंगली.

नव्याने नियुक्त झालेले सोलापूरचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील हे रविवारी रात्री उशिरा सोलापूर दौऱ्यावर प्रथमच आले होते. सोलापुरात आल्यानंतर त्यांना पहिला झटका बसला. भीम आर्मीच्या कार्यकर्त्यांनी त्यांच्यावर शाई फेकत काळे झेंडे दाखवले. चंद्रकांत पाटलांच्या अंगावर शाई टाकण्याचा प्रकार हा काही प्रथमच नाही .यापूर्वी देखील भीम आर्मीच्या सैनिकांनी असाच प्रकार कोल्हापूरमध्ये देखील केला होता. मात्र तत्कालीन पालकमंत्री राधाकृष्ण विखे- पाटील यांच्यावर भंडारा टाकल्याच्या घटनेनंतर पोलीस यंत्रणा सतर्क होती. नव नियुक्त पालकमंत्री चंद्रकांत पाटील पहिल्यांदाच सोलापूर शहरात येणार असल्याने आयएएस, आयपीएस असे वरिष्ठ अधिकारी शासकीय विश्रामगृहात ठाण मांडून होते. त्याचवेळी राधाकृष्ण विखे - पाटील यांच्या भंडारा टाकणारा शेखर बंगाळे आला पोलिसांनी त्यांची यापूर्वीचे कृती पाहता त्याला ताब्यात घेतले. मात्र शेवटी राडा व्हायचा तो झालाच.

रविवारी रात्री चंद्रकांत पाटील यांचे आगमन होताच भीम आर्मीच्या पदाधिकाऱ्यांनी शासकीय विश्रामगृह येथे शाई फेकण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले मात्र हा सर्व प्रकार वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या समक्ष घडला. त्यामुळे पालकमंत्र्यांच्या या दौऱ्याला पोलिसांनी सुरक्षेचे एक कडवे कवच निर्माण केले. सोमवारच्या सर्व बैठका पालकमंत्र्यांनी पोलीस बंदोबस्तात घेतल्या. जिल्हा नियोजन समिती असो अथवा शासकीय विश्रामगृहातील भोजनाची वेळ असो किंवा महापालिका यासर्व ठिकाणी पोलिसांचा मोठा गराडा दिसून आला. पालकमंत्र्यांचा पहिलाच दौरा दडपणाखाली झाल्याचे निदर्शनास आले. पालकमंत्र्यांना निवेदन देण्यासाठी आलेल्या इतर नेते मंडळी आणि पदाधिकाऱ्यांना या सुरक्षा यंत्रणेचा नाहक फटाका बसला हे अति झाले ? असा पालकमंत्री आम्ही पाहिला नाही ? असा सवाल करत अनेकजण पालकमंत्र्याविषयी नराजी व्यक्त करताना दिसून आले.

या बाबत भाजप पदाधिकाऱ्यांना विचारणा केली असता पंतप्रधानाच्या धोरणात्मक निर्णयाची हमी देत मंत्र्यांना प्रसारमाध्यमाची बोलण्यास बंदी असल्याच्या गोंडस नावाखाली वेळ मारून नेली.

## लांबोटी पुलावर अपघात; मुलगा ठार

**सोलापूर** : पुणे महामार्गावरील लांबोटी येथील पुलावर अनोळखी वाहनाच्या धडकेने दुचाकीवरील ११ वर्षीय मुलगा ठार तर त्याचे आई-वडील गंभीर जखमी झाले. हा अपघात सोमवारी सकाळच्या सुमारास घडला.

शिवशंभू शंकर धर्मे (वय ११ रा.ईश्वरवठार ता.पंढरपूर) असे मयत झालेल्या मुलाचे नाव आहे.तर त्याचे वडील शंकर बिरमल धर्मे (वय ४०) आणि आई रंजना धर्मे (वय २८) हे दोघे जखमी झाले. त्यापैकी शंकर धर्मे यांची प्रकृती गंभीर आहे. सोमवारी सकाळी ७ वाजेच्या सुमारास शंकर धर्मे हे आपने पत्नी रंजना आणि मुलगा शिवशंभू यांच्यासोबत दुचाकिवरून र्‍इश्वरवठार येथून सोलापूरच्या दिशेने निघाले होते.लांबोटी (चंदननगर) येथील पुलावर पाठीमागून अनोळखी वाहन धडकल्याने तिघेही गंभीर जखमी होऊन रस्त्यावर पडले होते. तिघांना रुग्णवाहिकेतून सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले असता त्यापैकी शिवशंभू धर्मे हा ११ वर्षाच्या मुलगा उपचारापूर्वी मयत झाला. या अपघाताची प्राथमिक नोंद तालुका पोलिसात झाली आहे.




# रंगभवनजवळील सात दुकानांना भीषण आग

**विविध साहित्यांसह ४० लाखांचे नुकसान**

सुराज्य/सोलापूर

रंगभवनजवळील सात दुकानांना सोमवारी दुपारी भीषण आग लागली. यात विविध साहित्यांसह सात दुकानांचे सुमारे ४० लाखांचे नुकसान झाले आहे. अग्निशामक दलाच्या जवानांनी तातडीने धाव घेऊन १२ गाड्या पाणी मारून आग आटोक्यात आणली. आग विझविण्यासाठी सुमारे साडेतीन तासांचा कालावधी लागला.

सोमवारी दुपारी अडीचच्या सुमारास रंगभवनजवळ असलेल्या दुकानाला अचानक आग लागली. बघता बघता आगीने रौद्ररूप धारण केले. एकमेकांना दुकाने लागून असल्याने अनेक दुकानांना आगीने घेरले. आग भडकत गेल्याने दूरवरून आगीच्या ज्वाळा व धुराचे काळे लोळ दिसत होते. त्यामुळे बघ्यांची मोठी गर्दी झाली होती. आगीची माहिती समजताच काही वेळातच महापालिकेच्या अग्निशामक दलाचे बंब घटनास्थळी दाखल झाले.

अग्निशामक दलाच्या जवानांनी पाण्याचा मारा करून आग विझविण्यास सुरुवात केली. परंतु मोठ्या प्रमाणात आग पसरल्याने सात दुकानांतील साहित्य आगीच्या भक्ष्यस्थानी पडले. आगीचे नेमके कारण समजू शकले नाही. अचानक लागलेल्या आगीमुळे दुकानदारांची धावपळ उडाली. सायंकाळी सहाच्या सुमारास आग पूर्णपणे विझवण्यात यश आले. लक्ष्मण आतप्पा तळभंडारे यांच्या क्लासिक सोफा कुशन सेंटरच्या दुकानाला लागलेल्या आगीत २० ते २२ लाखांचे साहित्य जळून खाक झाले. राज केन फर्निचरला लागलेल्या ५ लाखांचे साहित्य जळाले. जब्बार शेख यांच्या न्यू बॉम्बे ऑटो इलेक्ट्रिक दुकानाच्या आगीत सुमारे सहा लाखांची हानी झाली. सलिम फर्निचर दुकानाच्या आगीत दोन लाखांची हानी झाली. या भीषण आगीत सात दुकानांचे सुमारे ४० लाखांचे नुकसान झाले आहे. आगीची घटना समजताच एमआयएमचे शहराध्यक्ष फारूक शाब्दी यांनी पक्षाच्या पदाधिकाऱ्यांना आग विझवण्याकामी मदत करण्याचे आदेश दिले. त्यानंतर पदाधिकाऱ्यांनी आग विझवण्यासाठी परिश्रम घेतले.

## दारूच्या नशेत पडल्याने मेकॅनिक ठार

**सोलापूर** : दारूच्या नशेत दुसऱ्या मजल्यावरून खाली पडल्याने ५० वर्षीय विवाहीत इसम मयत झाला. ही घटना अशोक चौक परिसरातील क्सिस बँकेजवळ असलेल्या महापदम कॉम्प्लेक्स येथे रविवारी रात्रीच्या सुमारास घडली.

शिवानंद मल्लिकार्जुन जुजगार (वय ५० रा.महापदम् कॉम्प्लेक्स अशोक चौक) असे मयत झालेल्या इसमाचे नाव आहे. तो काल रात्री ११ वाजेच्या सुमारास कॉम्प्लेक्सच्या दुसऱ्या मजल्यावरून दारूच्या नशेत खाली कोसळला. बँकेच्या कंपाउंडवरील टोकदार अँगल डोकिस लागल्याने तो गंभीर जखमी होऊन जागीच मयत झाला. मयत शिवानंद जुजगार हा टीव्ही मेकॅनिकचे काम करीत होता. तो आपला भाऊ आनंद जुजगार याच्यासोबत कॉम्प्लेक्स मध्ये रहात होता. त्याच्या पश्चात पत्नी आणि तीन मुले असा परिवार असून ते सर्वजण पुणे येथे राहण्यास आहेत.अशी माहिती पोलिसांकडून मिळाली. या घटनेची नोंद जेलरोड पोलिसात झाली. हवालदार कपिल कांबळे पुढील तपास करीत आहेत.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



पाळावा की नाही?

कल्याण
268-67-179

मुंबई
660-25-456

# उजनी धरणाच्या पाणी साठ्यात घट होण्यास सुरुवात

## अद्याप नियोजनाचा पत्ता नाही

सुराज्य/टेंभुर्णी

**सोलापूर जिल्ह्याची वरदायिनी उजनी धरणाची वाढ थांबली असून, दौंड येथून येणारा विसर्गही बंद झाला आहे. मागील पाच सहा दिवसांपासून उजनीची टक्केवारी ६० वरच स्थिरावली आहे. परतीचा पाऊस माघारी फिरल्यामुळे उजनी शंभर टक्के भरण्याची शक्यता कमीच आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे.**

चालू वर्षी शेतीसाठी किती आवर्तने मिळणार, हा कळीचा मुद्दा ठरणार आहे. मागील दहा ते बारा दिवसांपासून उजनीच्या पाणलोट क्षेत्रात पडणारा पाऊस थांबला आहे. दौंड येथून येणारा विसर्ग कमी किमी होत तो बंद झाला असून, उजनीची संथगतीने सुरू असलेली पाणी साठ्यातील वाढ आता पूर्णपणे थांबली आहे. उजनी धरण ६०.६६ टक्क्यांवरच स्थिरावलेला उजनीचा पाणीसाठा कमी होण्यास सुरुवात झाली आहे. गेल्या २४ तासात उजनीमध्ये घट झाली असून, सध्याला ६०.५६% एवढा साठा झाला आहे.

मागील पावसाळ्यात उजनी धरण १७ जानेवारीपर्यंत शंभर टक्के भरलेले होते. त्यावेळी धरणात एकूण जलसाठा ११७ टीएमसी होता, तर उपयुक्त साठा ५३.५७ एवढा होता. केवळ साडेतीन महिन्यांत धरणातील ५३ टीएमसी उपयुक्त पाणीसाठा संपूर्ण ७ मे २०२३ पासून धरण मायनसमध्ये जाण्यास सुरुवात झाली होती. ९ जुलैपर्यंत धरण मायनस ३६.१९ टक्के झाले होते. यावेळी मृतसाठ्यातील १२ टीएमसी पाण्याचा वापर करण्यात आला होता. यानंतर दि. १ ऑगस्टपासून धरण प्लसमध्ये येण्यास प्रारंभ झाला होता. मात्र, चालू वर्षी उजनीच्या पाणलोट क्षेत्रात दमदार पाऊस न झाल्याने अडीच महिने झाले तरी उजनी धरण ६०.६६ टक्क्यांवरच रेंगाळत होते. त्यातही आजपासून घट होण्यास सुरुवात झाल्यामुळे ही बाब शेतकऱ्यांची चिंता वाढवणारी आहे.



### धरणाची सद्यस्थिती

एकूण पाणी पातळी ४९४.८९५ मीटर, एकूण जलसाठा.२७२१.६७ दलघमी (९६. १० टीएमसी), उपयुक्त साठा ९१८.८६ दलघमी (३२.४५ टीएमसी), टक्केवारी ६०.५६, सध्या उजनी धरणातून सोडण्यात येणारे पाणी, सीना-माढा उपसा सिंचन ३३३ क्युसेक, दहिगाव उपसासिंचन १२० क्युसेक

# नाराजीचा सूर...

भाजपला सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी चार वर्षांपूर्वी झालेला महाविकास आघाडीचा प्रयोग आणि त्यापाठोपाठ आलेली कोरोना लाट राज्यभरातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये मांड ठोकून बसलेल्या राजकीय सत्ताधीशांच्या उतरंडीचा काळ ठरला. भाजपला सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी चार वर्षांपूर्वी झालेला महाविकास आघाडीचा प्रयोग आणि त्यापाठोपाठ आलेली कोरोना लाट राज्यभरातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये मांड ठोकून बसलेल्या राजकीय सत्ताधीशांच्या उतरंडीचा काळ ठरला. तेथील स्थानिक सत्ताकेंद्रे संपुष्टात येऊन प्रशासकीय राजवटींच्या माध्यमातून त्यांची सूत्रे नगरविकास खात्याकडे आली आणि त्या खात्याच्या माध्यमातून एकनाथ शिंदेंकडे. राज्यात गेल्या दीड वर्षांपासून सुरू असलेल्या 'शिंदे राजवटी'ची पायाभरणी याच काळात झाली. साधारणपणे नगरविकास विभागाची सूत्रे मुख्यमंत्री स्वत:कडे ठेवतात, असा प्रघात आहे. देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री असताना नगरविकास आणि गृह अशी दोन्ही खाती स्वत:कडे ठेवली होती. उद्धव ठाकरे यांनी मात्र हे महत्त्वाचे खाते शिंदे यांच्याकडे सोपवून राज्यभरातील संपूर्ण शहरी प्रशासनाचा आणि एका अर्थी राजकीय व्यवस्थेचाही ताबा त्यांच्याकडे दिला. याच कोरोना काळात नवी मुंबई, छत्रपती संभाजीनगर, कल्याण डोंबिवली, वसई-विरार यांसारख्या महत्त्वाच्या महापालिकांचा कारभार प्रशासकाच्या हाती आला. एरवी ठाणे, डोंबिवली यांसारख्या शहरांच्या सत्तेपुरते मर्यादित राहिलेले शिंदे यांचे प्रभावक्षेत्र याच काळात संपूर्ण मुंबई महानगर प्रदेशात विस्तारू लागले. नवी मुंबई महापालिकेचे सत्तापद गणेश नाईक यांच्याकडून कधीही निसटले नव्हते. वसई-विरारमध्येही ठाकुरांच्या दबदब्यापुढे कुणाचेही काही चालत नव्हते. प्रशासकीय कालावधीत ही शहरे शिंदे यांच्या आधिपत्याखाली आली. मुंबईचा कारभार मातोश्रींने हाकायचा आणि मुंबईलगतची शहरे शिंदेनी ताब्यात घ्यायची, अशी अलिखित व्यवस्था तेव्हा रूढ झाली.



कोरोनाकाळात महानगर पट्ट्यातील शहरांमधील परिस्थिती हाताबाहेर जात असल्याचे पाहून तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचे प्रशासकीय सल्लागार अजोय मेहता यांनी येथील महापालिकांवर नव्या दमाच्या आयुक्तांची नियुक्ती करून घेतली. यापैकी काही नियुक्त्या या शिंदे यांना डावलून करण्यात आल्या होत्या. नवी मुंबईत अण्णासाहेब मिसाळ हे शिंदे यांच्या मर्जीतील मानले जात. त्यांना बदलून अभिजित बांगर यांची, तर ठाण्यात शिंदे यांना नको असलेले विजय सिंघल यांची नियुक्ती केली गेली. सिंघल यांच्या काळात तर अजोय मेहता थेट महापालिकेत बैठका घेऊ लागले. हे शिंदे यांना अस्वस्थ करणारे होते. नगरविकास खाते असूनही शिंदे यांची नव्या सत्तेत फारशी पकड नाही अशा चर्चा अगदी कोविडकाळात सुरू झाल्या होत्या. मात्र, ही परिस्थिती शिंदे यांनी मोठ्या राजकीय मुसद्दीपणाने हाताळली. बांगर यांची नियुक्ती होऊनही त्यांना २१ दिवस प्रतिक्षेत ठेवण्यात आले. शिंदे यांचा 'ना हरकत' दाखला आणल्यानंतरच त्यांना नवी मुंबई महापालिका मुख्यालयाची पायरी चढता आली. ठाण्यात 'आव्हानवीराच्या' आवेशात आलेल्या सिंघल यांना दीड महिन्यात माघारी बोलविण्यात आले. मुंबई वगळली तर ठाण्यासह महानगर प्रदेशात शिंदे म्हणतील तीच पूर्व दिशा असा संदेशच या घडामोडींमुळे दिला गेला आणि तेथूनच शिंदे यांचे राजकीय प्रभावक्षेत्र विस्तारू लागले. राज्याच्या आर्थिक नाड्या या मुंबईसह महानगर प्रदेशातील प्रमुख शहरांमध्ये एकवटल्याचे पाहायला मिळते. २०१४ नंतर या संपूर्ण पट्ट्यातील भाजपची राजकीय ताकद सतत वाढताना दिसते. शिंदे यांचा बालेकिल्ला असलेल्या ठाणे जिल्ह्यातही भाजपचे शिवसेनेपेक्षा अधिक आमदार आहेत. नवी मुंबई, पनवेल, कल्याण डोंबिवली, मीरा-भाईंदर आणि मुंबईतही भाजपची ताकद वाढत असली तरी स्थानिक स्वराज्य संस्थांमधील प्रशासकीय राजवटीमुळे या शहरांच्या आर्थिक नाड्या आधी नगरविकासमंत्री आणि आता मुख्यमंत्री म्हणून शिंदे यांच्याकडेच स्थिरावल्याचे दिसते. ठाकरे सरकारमध्ये मुंबई महानगर विकास प्राधिकरण, सिडकोसारख्या हजारो कोटी रुपयांचे प्रकल्प राबविणाऱ्या संस्थांच्या नाड्या मातोश्रीशी जवळीक साधून असणाऱ्यांकडे असल्याची चर्चा होती. नगरविकासमंत्री असूनही मुंबईसह या महामंडळांच्या निर्णय प्रक्रियेत फारसा वाव मिळत नसल्याचा नाराजीचा सूर शिंदे गटातून दबक्या आवाजात पुढे येत असे. नव्या राजकीय व्यवस्थेत ही व्यवस्था मुख्यमंत्र्यांच्या हाती एकवटल्याने मुंबई महानगर पट्ट्यात तरी भाजपला शिंदे यांच्याच प्रभावाखाली वावरावे लागत असल्याचे चित्र कायम आहे. युती व आघाडी पक्ष्यांच्या सरकारमध्ये लहान पक्षांना पडती बाजू घ्यावी लागते १९९५ मधे युतीच्या सरकारमध्ये भाजप हा लहान पक्ष होता त्यामुळे शिवसेना जो निर्णय घेईल तो भाजप ला मान्य करावा लागत होता. आत्ताच्या महायुतीच्या सत्तेत भाजप मोठा पक्ष आहे शिंदे यांचा गट लहान पडला आहे. त्यामुळे शिंदे गटाला पडती बाजू घ्यावी लागत आहे. शिंदे गटाला भाजप शिवाय पर्याय उरलेला नाही.

---

राजकीय

# भ्रष्टाचाराच्या दलदलीत 'आप'

**ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या भ्रष्टाचारमुक्तीच्या चळवळीतून जन्माला आलेल्या आम आदमी पक्षाबद्दल देशातील जनतेच्या अपेक्षा प्रचंड वाढल्या होत्या; परंतु 'आप'चे पायही मातीचेच असल्याचे स्पष्ट झाले. मद्य घोटाळ्यासह मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानाच्या डागडुज्जीवर झालेल्या कोट्यवधी रुपयांच्या खर्चामुळे 'आप'बद्दल साशंकता निर्माण झाली असून आता खासदार संजय सिंह यांना झालेली अटक 'इंडिया' आघाडीवरही परिणाम करू शकते.**

स्वच्छ चारित्र्याचे प्रमाणपत्र घेऊन राजकारणात उतरलेल्या आणि दोन राज्यांमध्ये सत्तेवर आलेल्या 'आप'च्या कथित गैरव्यवहारामुळे काही मंत्री तुरुंगात आहेत. मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्याभोवतीही मद्य घोटाळ्याचे वादळ घोंघावते आहे. त्यातच आता खासदार संजय सिंह यांना 'ईडी'ने अटक केली. दारू घोटाळ्याप्रकरणी दहा तासांच्या प्रदीर्घ चौकशीनंतर त्यांना अटक करण्यात आली. मद्यावरील सीमाशुल्क तपास प्रकरणात प्रमुख आरोपी दिनेश अरोरा तपास यंत्रणांचा साक्षीदार बनल्यानंतर संजय सिंह यांना अटक करण्यात आली आहे. आप संजय सिंह यांना क्रांतिकारकाच्या स्वरूपात पाहते. ते घाबरले नाहीत आणि घाबरणारही नाहीत. अन्यायाविरुद्ध लढत राहणार, असे या पक्षाने म्हटले आहे. केजरीवाल यांनी संजय सिंह यांची अटक बेकायदेशीर ठरवली आहे. माजी उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांच्या अटकेनंतर संजय सिंह हे आम आदमी पक्षातील अरविंद केजरीवाल यांच्यानंतरचे दुसरे मोठे नेते होते. आम आदमी पक्षाच्या राजकीय व्यवहार समितीचे सदस्य असण्याबरोबरच संजय सिंह हे पक्षाचे राष्ट्रीय प्रवक्तेदेखील आहेत. याशिवाय उत्तर प्रदेश-बिहारमध्ये पक्षाची धुरा त्यांच्याकडे आहे. संदीप पाठक यांच्यासह ईशान्येकडील आणि देशातील इतर राज्यांमध्ये संघटना उभारण्यात त्यांची महत्त्वाची भूमिका आहे. विरोधी पक्षांच्या 'इंडिया' आघाडीमध्ये आम आदमी पक्षाचा चेहरा असणारे संजय सिंग समन्वयाची जबाबदारीही सांभाळतात. पक्षाच्या प्रत्येक निर्णयाप्रसंगी त्यांचे म्हणणे ऐकायला मिळते. इतर पक्षनेत्यांच्या भेटीगाठींमध्येही आणि निवडणूक रणनीती-पक्षाची समीकरणे ठरवण्यातही त्यांची भूमिका महत्त्वाची असते.

संजय सिंह यांच्या अटकेमुळे 'आप'ला झटका बसला. सिसोदिया यांच्या अटकेनंतर आम आदमी पक्षाला बसलेला हा दुसरा मोठा धक्का आहे. हा धक्का 'आप'चे राष्ट्रीय संयोजक आणि दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्यापेक्षा पक्षासाठी अधिक आहे. कारण सिसोदिया यांच्या अटकेनंतर संजय सिंह केजरीवाल यांचे 'सेकंड इन कमांड' बनले होते. पक्षाच्या महत्त्वाच्या जबाबदाऱ्या संजय सिंह यांच्या खांद्यावर होत्या. ते उत्तर प्रदेशचे आहेत. २०११ मध्ये ते हजारे यांच्या दिल्लीतील भ्रष्टाचारविरोधी आंदोलनात सामील झाले. नोव्हेंबर २०१२ मध्ये आम आदमी पक्षाची स्थापना झाली तेव्हा ते मुख्य सदस्यांपैकी एक होते. संजय सिंह हे आम आदमी पक्षाचे सर्वात बोलके नेते मानले जातात. त्यामुळे पक्षाच्यावतीने अनेक मुद्द्यांवर उघडपणे बोलतात. हिंदी भाषिक राज्यांच्या राजकारणात त्यांची सक्रियता स्पष्टपणे दिसून येते. उत्तर प्रदेशच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत संजय सिंह यांच्यामुळे 'आप'चे खाते उघडले. पक्षाची रणनीती आणि बैठकांमध्ये त्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची होती. गाझियाबाद, कौशांबी, फिरोजाबाद, बदायूंसह उत्तर प्रदेशमधील अनेक जिल्ह्यांमध्ये आम आदमी पक्षाने विजय मिळवला होता. गेल्या विधानसभा निवडणुकीत मात्र या पक्षाला एकही जागा जिंकता आली नाही. संजय सिंह यांची राजकीय समज चांगली आहे. गेल्या काही वर्षांमध्ये त्यांनी काँग्रेससह बिगरभाजप पक्षांशी संबंध प्रस्थापित केले. ते केजरीवाल यांच्यासोबत पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी तसेच उद्धव ठाकरे यांच्या भेटी घेतात.




संसदेत वेगवेगळे मुद्दे मांडणारा पक्षाचा सर्वात मोठा चेहरा म्हणून त्यांची ओळख आहे. मणिपूर हिंसाचार, हाथरस बलात्कार प्रकरण, कोरोना, बेरोजगारी, अल्पसंख्याकांचे प्रश्न, शेतकऱ्यांचे आंदोलन आदी अनेक मुद्द्यांवर संजय सिंह राज्यसभेत आवाज उठवताना दिसत राहिले. केजरीवाल यांनी मुख्यमंत्री होण्यापूर्वी जनतेला मोठी आश्वासने दिली. स्टेडियममध्ये शपथ घेतली, रस्त्यावर रात्र काढली. पण, कामाची संधी मिळताच त्यांनी मैदान सोडून पळ काढला. या नेत्यामुळे अडचणी कमी होतील आणि भ्रष्टाचाराच्या आरोपातून सुटका होईल, अशी लोकांची अपेक्षा होती; परंतु आज जनतेला तसा अनुभव येत नाही. दिल्लीमध्ये मिळालेल्या संधीचे पक्षाने भांडवल केले असते तर परिस्थिती बदलू शकली असती. 'आप'ने भ्रष्टाचाराविरोधात मोठी मोहीम उघडली तेव्हा केजरीवाल 'सोशल मीडिया'पासून सर्वसामान्यांच्या हृदयापर्यंत पोहोचले. आपण पंतप्रधानपदाचे दावेदार होऊ शकतो, असे त्यांना वाटू लागले आणि येथून त्यांची मोहीम फसली. भ्रष्टाचाराऐवजी मोदींविरोधी आवाज त्यांच्या ओठांवर सातत्याने दिसू लागला. कदाचित त्यामुळे आपण देशात भाजपला पर्याय देण्यात यशस्वी होऊ, असे त्यांना वाटले असावे. केजरीवाल एवढ्यावरच थांबले नाहीत. त्यांनी स्वत:ला हजारे यांच्यापेक्षा मोठे सिद्ध करण्याचाच प्रयत्न केला नाही, तर त्यांची चळवळ कमकुवत करण्याचे काम केले. कधी ते बलाढ्य मुख्तार अन्सारी यांना पाठिंबा देण्याबद्दल बोलले, तर कधी ते म्हणाले की, जो कोणी काँग्रेस किंवा भाजपला मत देईल तो देव आणि देशाचा विश्वासघात करेल.

केजरीवाल यांच्या उक्ती आणि कृतीतील फरकाचा फटका 'आप'ला सहन करावा लागला. हजारे यांना राजकारणात न येण्याचे आश्वासन दिले आणि नंतर आम आदमी पक्षाची स्थापना केली. लोकसभा निवडणुकीपूर्वी केजरीवाल यांनी आमदारांना खासदारकीचे तिकिट देणार नसल्याचे सांगितले आणि त्यानंतर उत्तर-पश्चिम दिल्लीतून राखी बिर्ला यांना तिकिट दिले. दिल्ली विधानसभा निवडणुकीदरम्यान पक्षाने प्रत्येक निर्णय जनतेशी सल्लामसलत करून घेतला; परंतु लोकसभा निवडणुकीपर्यंत परिस्थिती पूर्णपणे बदलली. सार्वत्रिक निवडणुकीत पक्षाने मनमानी पद्धतीने तिकिट वाटप केले. पैशासाठी तिकिट विकल्याचा आरोपही पक्षावर झाला. ही परिस्थिती पाहून मतदारांनी निवडणुकीत 'आप'ला नाकारले. 'आप'च्या नेत्यांमध्ये समन्वयाचा मोठा अभाव होता. सुरुवातीच्या टप्प्यात सर्व नेते एकाच आवाजात बोलत होते; पण जसजसा निवडणुकीचा प्रचार पुढे सरकत गेला, तसतसा 'आप'मधील गोंधळही वाढत गेला. केजरीवाल आणि कंपनीवर अनेक गंभीर आरोप करण्यात आले. अनेक दिग्गज निवडणुकीच्या मैदानातून पळून गेले. आप' कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने भाजप आणि इतर पक्षांमध्ये प्रवेश केला. अनियमिततेमुळे अनेक संस्थापक सदस्य 'आप'पासून दुरावले. अमेठीमध्ये एकटे पडल्यामुळे कुमार विश्वास आधीच केजरीवाल यांच्यावर नाराज झाले. राजकारणात येताच केजरीवाल यांनी ध्रुवीकरण आणि जातीच्या राजकारणाला विरोध केला; पण तेही इतर पक्षांप्रमाणे आप'जातीय राजकारणात रंगला. त्यांनीही निवडणुकीत जातिनिहाय तिकिटे वाटली. प्रचार करताना मतदार कोणत्या जातीचा आहे, याचा विचार करण्यात आला.

केजरीवाल, कुमार विश्वास, आशुतोष, शाझिया इल्मी यांसारखे पक्षाचे नेते एकापाठोपाठ वादात अडकत राहिले. कधी त्यांच्या वक्तव्यावरून तर कधी कृतीवरून गदारोळ झाला. लोकांच्या हृदयावर राज्य करण्याची इच्छा त्यांच्या अंत:करणात आणि मनावर इतकी प्रबळ झाली होती की, योग्य आणि अयोग्य या बाबी दुय्यम बनल्या. त्यामुळे जनता त्यांच्यावर नाराज झाली आणि पक्षश्रेष्ठींना अनेक ठिकाणी विरोधाला सामोरे जावे लागले. कधी त्यांच्यावर अंडी, टोमॅटो फेकले गेले, तर कधी शाईफेक करण्यात आली. आता 'आप'ला गमावत चाललेली विश्वासार्हता पुन्हा मिळेल की नाही, हे माहीत नाही; मात्र, पक्षाची प्रतिमा गढूळ बनत चालली आहे, एवढे नक्की.

**- अजय तिवारी.**

---

टुडेज् ब्लॉग

# 'जय श्री राम'च्या घोषणा ते विराट कोहलीचे टीशर्ट

गुजरात राज्यातील अहमदाबाद शहरातील नरेंद्र मोदी स्टेडियमवर विश्वचषक - २०२३ मधील भारत - पाकिस्तान यांच्यातील क्रिकेट सामना १४ ऑक्टोबर या दिवशी झाला. हा सामना चालू असताना आणि संपल्यावर घडलेल्या घटनांची चर्चा चालू झाली आहे. पहिली घटना म्हणजे सामना चालू असताना प्रेक्षकांतून 'जय श्री राम' च्या घोषणा देण्यात आल्या. दुसरी म्हणजे पाकिस्ताचा कर्णधार बाबर आझमच्या विनंतीवरून भारतीय क्रिकेटपटू विराट कोहलीने स्वत:चे टिशर्ट त्याला मैदानात दिले.

'कावीळ झालेल्या व्यक्तीला जग पिवळे दिसते', असे कायम म्हटले जाते. तोच धागा पकडणे येथे आवश्यक ठरते. याचा उलगडा पुढे होत जाईल. तामिळनाडूच्या मुख्यमंत्री महोदयांचे सुपुत्र आणि दाक्षिणात्य अभिनेता उदयनिधी स्टॅलिन यांनी भारत-पाकिस्तान सामना चालू असताना प्रेक्षकांतून दिलेल्या 'जय श्री राम' घोषणेची क्लिप ट्विट करत म्हटले आहे की, 'भारत खिलाडूवृत्ती आणि आदरातिथ्य यांसाठी प्रसिद्ध आहे; मात्र कर्णावती येथील नरेंद्र मोदी स्टेडियममध्ये पाकिस्तानच्या खेळाडूंसमवेत करण्यात आलेली वागणूक स्वीकाहार्य नाही. ती अत्यंत खालच्या दर्जाची आहे. खेळ दोन्ही देशांना संघटित करणारी शक्ती बनली पाहिजे. तसेच खऱ्या बंधूभावनेला प्रोत्साहन दिले पाहिजे. खेळाचा द्वेष पसरवणाऱ्या शस्त्राप्रमाणे वापर करणे निंदनीय आहे.'

'सनातन धर्मा'वर आक्षेप घेत त्याविषयी केलेल्या काही आक्षेपार्ह विधानांमुळे ते चर्चेत आले आहेत. तसेच ते त्या विधानांवर ठाम असल्याचा पुनरुच्चारही जाहीरपणे केला आहे. त्यावर त्यांच्या वडिलांनी म्हणजे तामिळनाडूच्या मुख्यमंत्र्यांनी सारवासारव करत त्यांचा बचाव करण्याचा प्रयत्नही केला.

पाकिस्तानचे खेळाडू जगातील कोणत्याही क्रिकेटच्या मैदानावर त्यांच्या पंथाप्रमाणे प्रार्थना (नमाज) करतात. याची छायाचित्रे अनेकदा माध्यमांतून प्रसिद्ध झालेली आहेत. तसेच सामना झाल्यावर निवेदकासमोर बोलताना पाकिस्तानच्या खेळाडूंनी प्रथम देवाचे नाव घेत मग पुढे विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे दिली आहेत. हे सुद्धा जगातील क्रिकेटप्रेमींना ज्ञात आहे. याविषयी उदयनिधी यांचे मत कळले पाहिजे. मैदानात करत असलेली प्रार्थना आणि देवाचे नाव घेऊन मगच बोलणे या दोन सूत्रांविषयी जागतिक स्तरावर कोणाला आक्षेप नाही. तसे असण्याचे कारणही नाही. देवाला प्रार्थना करणे आणि त्याचे नाव घेणे यावरून पोटशूळ उठणाऱ्यांना केवळ विशिष्ट धर्माला लक्ष



करून त्यांच्याविषयी ठरवून तिरस्कार, मत्सर, द्वेष करणे या पंगतीत बसवता येईल. आस्तिक व्यक्ती देवाशी जोडलेली असते. मग ती कोणत्याही पंथाची असो. त्यांनी देवाविषयी काय करावे? अथवा काय करू नये. याविषयी फुकटचे सल्ले देण्याचा आणि त्यावर आक्षेप घेत बरळण्याचे माझे कारण काय? याचा आस्तिक व्यक्तींना सल्ले देणारे, त्यांच्यावर टीका करणाऱ्यांनी आधी अभ्यास करावा. तोच न करता केवळ बडबड करत राहणे पुष्कळ सोपे आहे. कारण अभ्यास करायचा म्हणजे खाऊ नाही आणि तो काही लगेच होणारा नाही. जसे सध्या झटपट कृतीचे (इन्स्टंट) युग आहे. नास्तिक मंडळींचाही आदरच आहे. कारण भारताच्या संविधानाने प्रत्येक व्यक्तीच्या स्वातंत्र्याला महत्त्व दिले आहे. त्यामुळे नास्तिक व्यक्तीने आस्तिक व्यक्तीप्रमाणे कृती करावीच असा हट्ट धरण्याचा बालीशपणा करून काही उपयोग होणार नाही. आपल्याला धार्मिक मार्गे जायचे की अधार्मिक याची समज प्रत्येकाला आहे. त्यात ढवळाढवळ करून काहीच साध्य होणार नाही आणि वादाशिवाय काही पदरी पडणार नाही. उदयनिधी स्टॅलिन नेमके असेच करताना दिसत आहेत. वाद निर्माण होईल अशाच गोष्टी उगाळत बसण्यात त्यांना रस असल्याचे तेच दाखवून देत आहेत. तसेच त्यांना ज्या मुख्य सूत्राविषयी (सनातन धर्म) आक्षेप आहे, त्याच्याशी निगडित देशात कुठे काय घडल्यास त्यावर लगेच व्यक्त होत आहेत. उदा. जय श्री राम घोषणेचे सूत्र. याविषयी आक्षेप असणाऱ्या उदयनिधी स्टॅलिन यांना क्रिकेटप्रेमींकडूनच उत्तराची अपेक्षा आहे का? पाकिस्तानचा क्रिकेट संघ त्या घोषणेने दुखावला गेला असे त्यांनी म्हटलेले नाही. पण उदयनिधी यांना पोटशूळ उठला हे मात्र सत्यच. अशा प्रकारच्या आदरातिथ्याची अपेक्षा नव्हती. पाकिस्तानात आल्यासारखे वाटते, असे पाकिस्तानचा कर्णधार बाबर आझम याने भारतात आल्यावर म्हटले आहे. ते उदयनिधी यांना ठाऊक नाही का? यावरून हेच लक्षात येते की, भारताकडून केलेले आदरातिथ्य पाहून तो खूष झाला आहे.

तरी एक बरे झाले की, बाबर आझम याला स्वत:ची सही असलेले टीशर्ट देताना विराट कोहली याने नारिंगी (ऑरेंज) रंगाचे टीशर्ट परिधान केले होते. त्याचे सूत भगवा, केशरी या रंगांशी जुळवत त्यावरून वाद निर्माण केला गेला नाही. हे विशेषच म्हणावे लागेल. भारतीय संस्कृती 'संपूर्ण विश्व हेच आपले घर' मानण्याची शिकवण देते. रंग, जात, पंथ यांच्या डबक्यात पडून राहून भेदभाव करणे, कोणाला जाणीवपूर्वक दुखावणे शिकवत नाही. एकमेकांचे पाय ओढण्याच्या खेकडा प्रवृत्तीला भारतीय संस्कृतीत थारा नाही.

**- जयेश राणे, मुंबई.**

---


जन्म हा अखेरचा

पदार्थ दिसायला तीन असले तरी ते मुळात एकच आहेत. याचे विवेचन याआधी दिलेले आहे.

**एक एव शिव: साक्षाच्चिदानंदमयो विभु: ।**
**निर्विकल्पो निराकारो निर्गुणो निष्प्रपंचक: ।।५.३४।।**

सृष्टीच्या आरंभी परमात्मतत्व एकच असते. परंतु सृष्टीनिर्मितीच्या वेळी ते परमात्मा, जीवात्मा आणि प्रपंच अशा तीन ठिकाणी विभक्त होते. तो शुद्ध सत्त्व उपाधियुक्त असतो म्हणून 'परमात्मा'. अशुद्ध सत्त्व अथवा मिश्र उपाधियुक्त असतो तेव्हा 'जीवात्मा' आणि तमोगुणयुक्त असतो तेव्हा त्याला 'प्रपंच' म्हणतात. अशा प्रकारे तीन पदार्थ दिसत असले तरी ते सर्व मिळून एकच पदार्थ होय. त्यामुळे या तीनपैकी कोणत्याही एका पदार्थविषयी जिज्ञासा उत्पन्न झाली तरी ती दुसऱ्या दोन पदार्थाकडे घेऊन जाते. म्हणून येथे आत्मस्थलविषयी प्रथम सांगितले आहे

## सेव्यस्थल



**जीवभावं परित्यज्य यदा तत्त्वं विभाव्यये ।**
**गुरोश्च बोधयोगेन तदात्नानं प्रकीर्तित:**
।।१८.५।। सद्गुरुच्या उपदेशाने जेव्हा जीवभाव नाहीसा होऊन आत्मभाव स्थिर होतो तेव्हा त्याला 'आत्मस्थल' असे म्हणतात. छांदोग्य उपनिषदात आत्म्याची लक्षणे सांगितली आहेत. आत्म्याला पापाचा किंचित देखील स्पर्श नसतो. कारण पाप-पुण्याचा आधार मनुष्याचे अंत:करण असते. अंत:करणच पुण्य-पाप करते आणि सुख-दु:ख भोगते. अंत:करण जड आहे तर आत्मा चेतन आहे. जड वस्तू स्वत:च्या बळाने काही कर्म करु शकत नाही. परंतु आत्म्याच्या सानिध्यात अंत:करण असल्यामुळे त्याच्याकडून कर्मे घडतात. दिव्याच्या प्रकाशात मनुष्य कर्मे करतो, त्याप्रमाणे आत्म्याच्या सानिध्यात अंत:करणाकडून कर्मे होतात. **(क्रमश:) – काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

---

जनमानस

## 'भारत २०३६' जागतिक ऑलिम्पिक स्पर्धा घेण्यास तयार

मुंबईत जागतिक ऑलिम्पिक समितीच्या १४१ व्या अधिवेशनाचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झाले. या अधिवेशनात मोदी यांनी भारत २०३६ च्या ऑलिम्पिक स्पर्धा भरविण्यास तयार असल्याचे सांगितले आहे. जर जागतिक ऑलिम्पिक संघटनेने ही मागणी मान्य केली तर भारताच्या दृष्टीने ती घटना मोठा गौरव ठरेल.

आज जगात भारत एक महासत्ता म्हणून उदयास येत आहे. त्याला पूरक अशीच ही घटना असेल. काही वर्षांपूर्वी भारत जागतिक आर्थिक उलाढालीत दहाव्या क्रमांकावर होता आता तो पाचव्या क्रमांकावर आहे. नजीकच्या काळात तो जगात तिसऱ्या क्रमांकावर येईल. आज भारताची शिक्षण आरोग्य वाहतूक उद्योग या क्षेत्रात घोडदौड चालू आहे. या ऑलिम्पिक स्पर्धेमुळे जगात भारताची एक पर्यटनाची नवी ओळख जगाला होईल. याशिवाय खेळाडूंच्या दृष्टीने सुद्धा ती अभिमानाची घटना असेल. भारताने या अगोदर आशियाई क्रीडा स्पर्धांचे आयोजन अत्यंत सूत्रबद्धतीने व नियोजन पूर्वक केले होते. जगातील अनेक देशांचे खेळाडू प्रशिक्षक व प्रेक्षक या निमित्ताने भारतास भेट देतील. त्याचे भविष्यात अनेक फायदे अपेक्षित आहेत. आज जग अगदी जवळ आले आहे.

या जागतिक ऑलिम्पिक स्पर्धेच्या निमित्ताने मोठी आर्थिक उलाढाल अपेक्षित आहे. अनेक खेळाडू तयार होतील. देशातच या स्पर्धा झाल्यास त्याचा खेळाडूंना उपयोग होईल व या ऑलिम्पिकमधून अनेक भावी खेळाडू सुद्धा तयार होतील. आता जागतिक ऑलिम्पिक स्पर्धेत क्रिकेटचा सुद्धा समावेश झाला आहे, अशी बातमी वाचली. आज जागतिक विश्वचषक स्पर्धा भारतात सुरु आहे. अहमदाबाद येथील क्रिकेट मैदान सर्वसोईंनी युक्त आहे.

दिल्ली, कलकत्ता, चेन्नई तसेच मुंबई येथील मैदाने आतंरराष्ट्रीय दर्जाची आहेत. जागतिक पटलावर भारत अनेक गोष्टीत आगेकूच करीत आहे, तथापि संयुक्त राष्ट्रसंघात अद्यापही भारत सुरक्षा समितीत कायमचा सभासद नाही. जगात सर्वात मोठी लोकसंख्या व लोकशाही असलेले राष्ट्र जागतिक सुरक्षा समितीत कायमचा सभासद असणे अत्यंत जरुरीचे आहे. आज जगात अनेक राष्ट्रात युद्धजन्य स्थिती आहे. इस्त्रायल, युक्रेन इत्यादी देशात युद्ध सुरु आहे. अशा वेळी भारताची मध्यस्थी आवश्यक आहे. एकूणच नजीकच्या काळात ऑलिम्पिक स्पर्धा भारतात झाल्यास तो भारताच्या दृष्टीने एक मोठा गौरवच असेल.

**- शांताराम वाघ, पुणे.**

---

# सहकार वाचवला तरच...देश वाचेल...

सहकाराच्या चढउतारात व्याप्त झालेली कटूता काढून टाकून एकसंघ सहकार समृध्द सहकाराचे नेटवर्क आपली नैतिक जबाबदारी म्हणून सर्वांनी उभी करायला हवी. असे मत अमीत शहाजींनी मोठ्या धाडसाने राजाभाई टॉवर मुंबई येथे कणखर भूमिका मांडली.

मुंबई विद्यापीठाच्या वास्तुशिल्पाचा उत्कृष्ट नमुना म्हणून मुंबई विद्यापीठाची १८६९ साली पायाभरणी करण्यात आली होती. तर १८ जुलै १८५७ रोजी मुंबई विद्यापीठाची जिथे पायाभरणी झाली तिथे हायकोर्ट उभे करण्यात आले. आणि त्याच प्रांगणात मुंबई विद्यापीठही अत्यंत देखण्या स्वरूपात उभे राहिले. एकूणच जिथे विद्यापीठाची स्थापना करून पायाभरणी झाली, तिथे मोठ्या दिमाखात हायकोर्टाची अत्यंत देखणी वास्तु उभी करण्यात आली. अर्थात हायकोर्टही उभे राहिले आणि विद्यापीठही देखण्या वास्तुत उभे राहिले. अवघ्या जगाला मोहीत करणारी ही वास्तु वैकुंठभाई मेहता यांच्या आणि सहकारातील विखे-पाटील, त्रिभुवन पटेल या लोकांच्या औदार्यातून वास्तुशिल्पाची उभारणी झाली.

पहिल्या पदवीदान समारंभात सात विद्यार्थीवरच पदवीदान समारंभ पार पडला. गुजरात राज्याचेही मोठे योगदान या विद्यापीठासाठी आणि सहकारासाठी लाभले आहे. एकूण परिस्थितीचा आढावा घेतला तर आजघडीला सहकार कालबाह्य झाले नाही; उलट सहकाराला उजाळा मिळाला. त्याचबरोबर दिक्षांत सभागृहात वारसा लाभला. सहकाराचं एक नवं मॉडेल या निमित्ताने वैभवाला आलं. गॅस, वीज, शौचालय केंद्रसरकारच्या प्रयत्नाने प्रगत आले.



सहकार वाढवण्यासाठी सहकारी चळवळ उभी करण्यासाठी मोठे काम जगात राष्ट्रीय सहकार शिक्षण धोरणाचे स्वागत होताना सुरुवातील प्रेम ब आदरपूर्वक सर्वांना नमस्कार करावा लागेल. वेगवेगळ्या महाविद्यालयात याची माहिती सर्व थरात विद्यार्थ्यांना देखील उपलब्ध करून दिली पाहिजे. सर्वच विद्यापीठाची स्वायत्तता अखेर राजाभाई टॉवरचे एकशे छप्पन फुटाचे वैभव फार थोड्या वेळात उभे केले असून उंच आणि आकर्षक देखणेपण टॉवरला लाभले आहे. राजाभाई टॉवर दोनशे वीसच्या नव्या शिक्षण धोरणाची उभारणी देखील याच ठिकाणातून होणार आहे. कारण महामंत्री उदयराव जोशीजी, लक्ष्मणराव इनामदार हे एकूणच वेगळे रसायन होते. सतत काम करणे, सहकारातून सहकार उभा करणे. ही ऊर्जा सतत कार्यरत राहिली. आज गणपतीच्या उत्सवाचे दिवस आहेत. देशाला चेतना देणारे गृहमंत्री असे सहकारी लक्ष्मणराव इनामदारांच्या रुपाने सुरुवातीच्या काळात या संस्थेला लाभले. सातारच्या भूमीत नवं राजकारण सहकारात दिले. गुजरात आणि महाराष्ट्रात सेवाभाव उभारण्याचं काम या जुन्या जाणत्या नेत्यांनी करून दाखवलं. त्यामुळेच गुजरात आणि महाराष्ट्रामध्ये सहकाराचा सेतू उभा करण्याचे काम त्यावेळच्या राजकोय नेत्यांनी केले. विद्यापीठाचा राजाभाई टॉवर हे ज्ञानाचं प्रतिक असून शांत सागरात मुंबई विद्यापीठाच्या ज्ञानकळसावर किर्ती पोहोचली. जहाँगिर सभागृहात मुंबई विद्यापीठाच्यावतीने छत्तीस विभाग चालवले जातात. अवघे विश्वगुरुचे वैभव देशाच्या कानाकोपऱ्यात भारतभर पोहोचवले जाते.

मानवतेच्या दालनात देशाच्या उच्चतम वैभव विद्यापीठात असून उदय जोशीजी सहकार प्रमुख लक्ष्मणराव इनामदार हे मोदीजींना गुरुस्थानी मानत होते. लक्ष्मण इनामदार हे सर्वांचे प्रेरणास्त्रोत होते. त्यामुळेच लक्ष्मणराव ईनामदार यांचे मोठे योगदान या वास्तुला लाभले. कारण ते प्रेरणा पुरुष होते. सहकारात मित्र, मार्गदर्शक, वाटाड्या, जागरुक सभासद म्हणून अमितभाईंनी सर्वांचेच कौतुक केले. सहकार मंत्री म्हणून देशभरात राष्ट्राला स्फुर्ती मिळाली आहे. इतिहास वाचवायचा नसतो. तर इतिहास घडवण्याची क्षमता असलेल्या नेतृत्वाला अधिकार द्यायचा असतो. म्हणूनच जीवनात नुसता इतिहास वाचायचा नसतो तर तो स्वकर्तृत्वाने घडवायचा असतो. असा दैदिप्यमान इतिहास घडविण्याची क्षमता असलेला नेता, नेतृत्व, आधार देणारे लेखक आणि देशभक्त समाजाला लाभले. म्हणूनच त्यागमय साखळीची सुरुवात विद्यापीठाचे मॉडेल म्हणून मॉडेल बॉयलाज प्रत्येक राज्याला सहकाराच्या माध्यमातून पाठवले पाहिजे. सहकार वाढवणे, समृध्द करणे, सहकाराची रुंदी बाढबत राहणे, सहकारी बँकांचे समृध्दी वाढवत राहणे हा विचार उपस्थितांनी केला पाहिजे. सहकार हा मानवकेंद्रीत असून दिनानाथ ठाकूर सहकार भारतीचे अध्यक्ष आहेत. सहकार आंदोलन हेच देशाला तारु शकते. भारतराष्ट्राला समृध्द करू शकते.

**- प्रा. लक्ष्मण ढोबळे, माजी मंत्री, सोलापूर.**

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

# टेंभुर्णी परिसरात अवैद्य धंद्यांना उधाण

✔ सुराज्य/टेंभूर्णी

**टेंभुर्णी आणि परिसरातील ३० ते ३५ गावांमध्ये अवैध धंद्याने धुमाकूळ घातला असून, ठीकठिकाणी अवैद्य दारुविक्रीसारखे प्रकार चालले असून, याकडे मात्र संबंधितांचे दुर्लक्ष होत असल्याच्या तक्रारी आहेत.**

टेंभुर्णी पोलीस ठाण्याचे कर्मचारी बघ्याच्या भूमिकेत असल्यामुळे सामान्य नागरिकांना दाद नेमकी मागायची कोणाकडे? हा प्रश्न पडला आहे. त्यामुळे पोलीस कर्मचारी नेमके अवैध धंद्याला पाठीशी घालतात की सामान्य नागरिकाला न्याय देतात? असा सवाल केला जात आहे.

टेंभुर्णी शहर आणि आसपासच्या वीस ते पंचवीस गावांचा आर्थिक व्यवहार चालत असल्यामुळे हे एक गर्दीचे ठिकाण म्हणून ओळखले जाते. याच गर्दीचा फायदा घेऊन टेंभुर्णी शहरातील गुन्हेगार प्रवृत्तीचे लोक नागरिकांना धमकावणे दिवसाढवळ्या लुटणे आदींसह चोऱ्या-दरोडे असे प्रकार मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. याची दखल प्रशासकीय पातळीवर घेतली जात नसल्याने नाराजगी व्यक्त केली जात आहे.

त्यामुळे टेंभुर्णी व शहर परिसरातील अनेक गावातील नागरिकांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. विशिष्ट समुहातील २० ते २५ जणांचे टोळके छोट्या-छोट्या गोष्टींवरून

## सर्वसामान्यांना होतोय त्रास



सार्वजनिक ठिकाणी एकत्र येऊन वाद विवाद करणे, शिवीगाळ करणे, धमकावणे, हाणामारी करणे, रस्त्यावरील विक्रेत्यांकडून खंडणी वसूल करणे असे प्रकार वाढले असून यामुळे शहरातील शांतता भंग होत आहे. परिसरातील नागरीक वैतागले असून, शहरात भितीचे वातावरण निर्माण झाले असून, अशा लोकांच्या विरोधात टेंभुर्णी पोलिसांनी आळा घालून वेळीच बंदोबस्त करण्याची मागणी सामान्य नागरिकांतून होत आहे. संबंधित पीडित पोलीस ठाण्यात त्यांच्याविरुद्ध तक्रार करण्यासाठी गेले असता त्यांच्या संघटनेतील पदाधिकारी तक्रारदारांवर विनंती अथवा अन्यायग्रस्त नागरिकांनाच उलट त्यांच्यावरच केस ठोकण्याचा दम देऊन, सदरचे प्रकरण मिटवण्यासाठी प्रयत्नशील असतात. सर्वसामान्यांना अन्याय सहन करण्याशिवाय त्यांच्याकडे पर्याय नसते.

### दादागिरी, हाणामारीचे प्रमाण वाढल्याने नागरीक त्रस्त

टेंभुर्णी शहर हे जवळपास ४० ते ५० हजार लोकसंख्या असलेले शहर आहे. या ठिकाणी सर्वच समाजातील नागरिक राहत आहेत. परंतु मागील चार ते पाच वर्षापासून एका विशिष्ट वर्गातील ५० ते १०० जणांच्या समुहाने शहरातील शाळा, महाविद्यालय, प्राथमिक शाळा, कॉलेज, सांस्कृतिक कार्यक्रमाचे ठिकाणी दादागिरी, मारहाण करणे, गल्लीतील नागरिक, युवकांना धमकवणे असे प्रकार वाढलेले आहेत. कोणत्याही सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये या गटातील २० ते २५ वयोगटातील २५ ते ५० तरुण हे एकत्र येऊन दहशत माजवत आहेत.

### चोरी, दरोडे, खून, मारामारीच्या गुन्ह्यात वाढ

टेंभुर्णी शहर व परिसरातील अनेक गावामध्ये चोऱ्या, दरोडे, खून, मारामारी आणि अवैध धंद्यांच्या प्रमाणात वाढ झाली आहे. त्यामुळे टेंभुर्णी शहर व परिसरातील अनेक गावांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. अनेक गावामध्ये चोरीच्या घटना झालेल्या आहेत. नदीकाठची विजेची मोटर केबल, मोटार आदींच्या चोरीच्या प्रमाणात वाढ झाली आहे. तरी प्रशासनाने तातडीने याकडे लक्ष घालून, अशा प्रकारच्या गुन्हेगारीला आळा घालावी, अशी मागणी होत आहे.

## संक्षिप्त वृत्त...

### पतसंस्था समोरील हँडल लॉक केलेली दुचाकी चोरट्याने पळविली

✔ **सोलापूर** : चव्हाण पतसंस्था, रविवार पेठ येथे (क्र.एमएच.१३.एबी.८१९६) ही हॅण्डल लॉक करून पार्क करून ठेवलेली दुचाकी अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे. याप्रकरणी उस्मान बाबासाब कणीबंद (वय-५८, नवीन घरकूल, कुंभारी) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. तपास पोलीस हवालदार राठोड हे करीत आहेत.

### पूजा साहित्य खरेदीवेळी दोघांचे मोबाईल पळवले

✔ **सोलापूर** : पूजेचे साहित्य खरेदी करत असताना फिर्यादी माणिक मारुती राऊत (वय-५८,पद्मजा पार्क, जुळे सोलापूर) यांचा मोबाईल चोरट्याने चोरून नेला. ही घटना सोलापूर डी मार्ट पाण्याच्या टाकीजवळ घडली. याप्रकरणी माणिक राऊत यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला. तपास पोलीस नाईक शेख हे करीत आहेत. दुसरी घटना आसरा चौकातील बँक ऑफ बडोदाच्या रस्त्यावर घडली. फिर्यादी तिपण्णा विठ्ठल पवार (वय-३०, गुरुदेव नगर, जुळे सोलापूर) हे देखील पूजेचे साहित्य खरेदी करीत होते. त्यावेळी अज्ञात चोरट्याने त्यांचा मोबाईल चोरून नेला. याप्रकरणी पवार यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला. तपास पोलीस हवालदार हार हे करीत आहेत.

### व्हीडिओ काढत असताना ब्लेडने वार करून मारहाण

✔ **सोलापूर** : फिर्यादी रवी सिद्राम नागराळे (वय-४०, मड्डी वस्ती) हे राहत्या घरी शेंगा फुटाणे पॅकिंग करीत असताना संशयित आरोपी अशोक जक्कू खांडेकर हा फिर्यादीच्या घरासमोर आंघोळ करीत होता. त्यावेळी फिर्यादीने त्याचा व्हीडिओ काढत असताना अशोक खांडेकर, अश्विनी खांडेकर यांनी फिर्यादीला शिवीगाळ करून हाताने व लाथा बुक्क्यांनी मारहाण केली. त्यावेळी फिर्यादी यांची आई भांडण सोडवण्यासाठी मध्ये आली असता, त्यांनादेखील मारहाण केली. अशोक खांडेकर यांनी खिशातून ब्लेड काढून आई कमलाबाई यांच्या मनगटावर वार करून दुखापत केली. राम खांडेकर व नागम्मा खांडेकर यांनीदेखील फिर्यादी व त्यांच्या आईला मारहाण करून जखमी केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. ही घटना मड्डी वस्ती येथे घडली. याप्रकरणी रवी नागराळे यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यांच्या फिर्यादीवरून अशोक जग्गू खांडेकर, अश्विनी अशोक खांडेकर, राम खांडेकर, नागम्मा खांडेकर यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला. तपास पोलीस हवालदार रुपनर हे करीत आहेत.

### कारचा दरवाजा उघडल्याने दुचाकीस्वार धडकून जखमी

✔ **सोलापूर** : भैय्या चौक येथील रेल्वे ब्रीजच्या समोरील रस्त्यावर एका अज्ञात कार चालकाने कारचा दरवाजा उघडल्याने मोटारसायकलवरून जात असताना फिर्यादी छब्रीद पदन सामल (वय-६०, आर्यन पॅराडाईज, सलगर वस्ती, डोणगाव रोड) हे त्या कारच्या दरवाज्याला धडकून खाली पडून गंभीरित्या जखमी झाले. याप्रकरणी सामल यांनी सदर बझार पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात कारचालकाविरुद्ध गुन्हा दाखल झाला. तपास मपोह.लांबतुरे या करीत आहेत.



### उत्तर तालुका रिपाइंचे कोळा येथील अस्थिविहार स्मारकास अभिवादन

✔ **उत्तर सोलापूर** : उत्तर तालुका रिपाइं आठवले गटाच्यावतीने सांगोला तालुक्यातील कोळा येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणाभूमी अस्थिविहार स्मारकास अभिवादन करण्यात आले. यावेळी रिपाइं आठवले सोलापूर जिल्हा सरचिटणीस श्यामसुंदर (रवी) गायकवाड, सांगोला तालुका अध्यक्ष खंडू सातपुते, उत्तर सोलापूर तालुकाध्यक्ष विठ्ठल वाघमारे, तालुका सरचिटणीस नानासाहेब गायकवाड, मुकुंद मोरे, भीमराव काटे, विकास काटे, श्रीकांत मोरे, शशिकांत साबळे, विकास साबळे, किडबेसरी, धनंजय काटे, विकास काटे, दिनेश काटे, अमित मोरे, नामदेव कसबे उपस्थित होते.

## निधन वृत्त

### संजय पाटील



✔ **टेंभुर्णी** : माढा तालुक्यातील वरवडे येथील संजय मधुकर पाटील यांचे सोमवार, दि. १६ ऑक्टोबर २३ रोजी सकाळी ११वाजता हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. मृत्यूसमयी ते ५१ वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात आई-वडील, पत्नी, तीन बहिणी, एक मुलगा, एक मुलगी असा परिवार आहे. ते दैनिक पुण्यनगरीचे प्रतिनिधी म्हणून काम पाहत होते. टेंभुर्णी शहर ग्रामीण पत्रकार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संतोष वाघमारे, मुकुंद रामदासी सिध्देश्वर शिंदे, गणेश पोळ, विनायक जोशी आदी त्यांना श्रद्धांजली वाहिली.

### आनंता मदने



✔ **पिलीव** : माळशिरस तालुक्यातील कुसमोड येथील आनंता आगतराव मदने-पाटील यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने उपचारादरम्यान निधन झाले. मृत्यूसमयी ते ७० वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, सुना -नातवंडे असा परिवार आहे. ते पिलीव विकास सेवा सोसायटीचे माजी चेअरमन होत.

### संजय देशमाने



उत्तर सोलापूर- शिवगंगानगर, जुळे सोलापूर येथील रहिवासी संजय भीमाशंकर देशमाने (वय-५१) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, भाऊ, पत्नी, दोन लहान मुले असा परिवार आहे. पुष्पा हॉटेलचे

### तेजस्वीनी लोखंडे एमटेक उत्तीर्ण



✔ **पिलीव** : चांदापुरी (माळशिरस) येथील तेजस्वीनी बापू लोखंडे हिने एम.टेक. (कॉम्प्युटर) परीक्षेमध्ये ८८.३८ टक्के गुण मिळवून दैदिप्यमान यश प्राप्त केले आहे. त्या सध्या स्वेरी (गोपाळपूर) येथील कॉलेजमध्ये प्राध्यापिका म्हणून कार्यरत आहेत. त्यांचे आ. राम सातपुते, चांदापुरीचे सरपंच जयवंत आण्णा सुळ, तात्या चोरमले, शाहीद शेख, विजय पाटील, दत्ता निकम, आप्पा सरतापे, रशीद शेख, स्वेरीचे प्राचार्य, शिक्षकवृंद यांनी अभिनंदन केले आहे.

## पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी घेतले बसवारूढ महास्वामीजींच्या समाधीचे दर्शन

✔ सुराज्य/सोलापूर



पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी सोमवारी श्री.श्री.सद्गुरु बसवारूढ महास्वामीजींच्या समाधीचे दर्शन घेतले. पालकमंत्री पाटील हे बसवारूढ महास्वामीजी मठाचे गेल्या अनेक दशकांपासून भक्त आहेत. पालकमंत्री झाल्यापासून त्यांचा सोमवारी पहिलाच सोलापूर दौरा होता. या दौऱ्यात पालकमंत्री पाटील यांनी बसवारूढ मठ येथे भेट दिली.

त्यावेळी त्यांनी श्री राजराजेश्वरी देवी, बसवारूढ महास्वामीजींच्या समाधीचे दर्शन घेतले. याप्रसंगी सुरु असलेल्या हवनमध्येही ते सहभागी झाले. यावेळी पालकमंत्र्यांच्या हस्ते महामंगलारती करण्यात आली. यावेळी मठातर्फे त्यांचा आशीर्वादरुपी सत्कार मठाधिपती श्री. श्रो. ब्र. ईश्वरानंद महास्वामीजी यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी श्री. श्रो. ब्र. शिवपुत्र महास्वामीजी यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी पालकमंत्री पाटील यांनी मठाधिपती ईश्वरानंद महास्वामीजी यांच्या तब्येतीची विचारपूस केली. तसेच मठाची पाहणी केली. यावेळी पालकमंत्री पाटील यांनी मठाधिपती ईश्वरानंद महास्वामीजी यांचा सत्कार केला.

यावेळी माजी सहकारमंत्री आ. सुभाष देशमुख, भाजपचे सोलापूर लोकसभा प्रमुख विक्रम देशमुख, भाजपचे शहराध्यक्ष नरेंद्र काळे, मोहन डांगरे, सतिश कुलकर्णी, महादेव कोगनुरे आदी उपस्थित होते.

## महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाचे संकेतस्थळ हँग

✔ सुराज्य/माळीनगर

जानेवारी ते डिसेंबर २०२३ मध्ये मुदत संपणाऱ्या १०९ ग्रामपंचायतीची सार्वत्रिक निवडणूक दि. ५ नोव्हेंबर २०२३ रोजी होणार आहे. ऑनलाईन फॉर्म भरण्याची मुदत दि. १६ ऑक्टोबर ते २० ऑक्टोबर दरम्यान असून, त्यासाठीचे महाराष्ट्र निवडणूक आयोगाचे संकेतस्थळ व्यवस्थित चालत नसल्याने राजकीय पुढाऱ्यांची भलतीच तारांबळ उडाल्याचे दिसून येत आहे.

पहिल्याच दिवशी फॉर्म भरल्यास अपेक्षित निवडणूक चिन्ह मिळत असल्याने बऱ्याच इच्छुक सरपंच व सदस्य पदाच्या उमेदवारांनी ऑनलाईन फॉर्म भरण्यासाठी पहिल्याच दिवशी

### ग्रामपंचायत फॉर्म भरण्यास अडथळे

तयारी केली होती. निवडणूक आयोगाचे संकेतस्थळावर ऑनलाईन फॉर्म भरण्याची पद्धत अत्यंत किचकट व वेळखाऊ असल्याने फॉर्म भरण्यासाठी खूप वेळ जातो आहे. फॉर्म भरण्यासाठीची मार्गदर्शक माहिती मराठीमध्ये संकेतस्थळावर उपलब्ध नसल्याने लोकांची नाराजी व्यक्त होत आहे.

अशातच दुपारी २.४५ ते ३.४५ दरम्यान संकेतस्थळ दुरुस्तीसाठी पूर्णपणे बंद करण्यात आले होते. माहिती पूर्ण व व्यवस्थित भरावी, अपूर्ण राहू नये, यासाठी अनेक इच्छुक मंडळी ऑनलाईन केंद्रावर रांग लावून उभे होते.

# यंदा जिल्ह्यातील साखर कारखाने उसाला किती दर देणार?

## शेतकऱ्यांचे लागले लक्ष

✔ **पिलीव** : सोलापूर जिल्ह्यात यंदा समाधानकारक पाऊस न झाल्यामुळे उसाचे क्षेत्र कमालीचे घटले आहे. त्यामुळे यंदाच्या गळीत हंगामात कारखानदार प्रती टन किती ऊस दर देणार? याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

गेल्या हंगामात अनेक कारखान्यांनी एफआरप पेक्षा दर कमी दिला आहे. त्यांना अद्यापही दुसरा हप्ताच दिला गेला नाही. अशा कारखान्यांना शासनाने गळीतास परवानगी देऊ नये. मात्र यंदा पाऊसच नसल्यामुळे उसाची कारखान्याकडून ओढा-ओढी होणार आहे. यामध्ये जो कारखाना दर जाहीर करून चांगला दर देईल, त्याकडेच शेतकऱ्यांचा कल दिसत आहे.

सध्या अडचणीत असणाऱ्या शेतकऱ्यांना शासनाने चांगला दर द्यावा, अशी अपेक्षा असली तरी शेतकरी संघटनांनी यासाठी आवाज उठविणे अपेक्षीत आहे. याच महिन्यात साखर कारखाने सुरू होणे अपेक्षीत आहे. शेतकरी सुद्धा चांगल्या दरासाठी सतर्क आहे. त्यामुळे ऊस मिळविण्यासाठी कारखानदारांमध्ये चूरश निर्माण होणार आहे.



**एकीकडे खतांची वाढती किंमत, मशागतीचा खर्च यामुळे शेतकऱ्यांना किमान प्रती टन ३५०० रुपये दर देणे अपेक्षीत आहे. यंदा बाजारात दरवर्षीपेक्षा साखरेला चांगला दर आहे. किमान ४१ रुपये किलो एवढा दर आहे. त्यामुळे उसाला प्रतीटन दरवाढ होऊन चांगला दर देणे अपेक्षीत आहे. साखर कारखानदार उसासाठी चढाओढ करतील, तसे दरासाठीसुद्धा चढाओढ होणे अपेक्षीत असणार आहे.**



## स्वेरी-इंडवेल ऑटोमेशन यांच्यात सामंजस्य करार

✔ सुराज्य/पंढरपूर

गोपाळपूर (पंढरपूर) येथील श्री विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित (स्वेरी) कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमधील इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग या विभागाच्यावतीने 'अॅडव्हान्स्ड इंडस्ट्रीयल ऑटोमेशन' या विषयावर दहा दिवसीय कार्यशाळा आयोजित केली होती. याप्रसंगी 'स्वेरी' आणि 'इंडवेल ऑटोमेशन, मंगळुरू' यांच्यामध्ये सामंजस्य करार करण्यात आला.

या कार्यशाळेत दीडशे विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. स्वेरीच्या ट्रेनिंग व प्लेसमेंट विभागाच्या सहकार्याने प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे, विभागप्रमुख डॉ.मिनाक्षी पवार यांच्या नेतृत्त्वाखाली आयोजित या कार्यशाळेत अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या कार्यशाळेचे उद्घाटन मंगरूळच्या इंडवेल ऑटोमेशनचे संस्थापक-ट्रेनर हिमांशू कुमार यांच्या हस्ते करण्यात आले. प्रास्ताविक विभागप्रमुख डॉ. मिनाक्षी पवार यांनी केले. समन्वयक म्हणून प्रा.सागर वायचवरे यांनी काम पाहिले. सूत्रसंचालन दिशा भट्टड, आभार वृषाली जानगवळी यांनी केले.

## मतिमंद निवासी विद्यालयास सौरऊर्जा भेट

✔ सुराज्य/सोलापूर



आधार मतिमंद निवासी विद्यालय कुंभारी ता. दक्षिण सोलापूर येथे हिसोआ इलेक्ट्रॉनिक्स प्रायव्हेट लिमिटेड कंपनी यांच्यावतीने सामाजिक दायित्व अंतर्गत विद्यालयास सौर ऊर्जा यंत्र, चपाती बनवायचे यंत्र आणि ऑक्सिमीटर कंपनीचे मानव संसाधन व्यवस्थापक सौम्या बक्षी यांच्या हस्ते शाळेत सुपूर्त करण्यात आले.

अध्यक्षस्थानी संस्थेचे संस्थापक जगदीश कलकेरी होते. प्रमुख पाहुणे म्हणून कंपनीचे प्रशासकीय मॅनेजर सागर घाडगे, कंपनीचे सहाय्यक व्यवस्थापक रोहित वाळके, विक्री व्यवस्थापक संदीप राजोबा, गोविंद लड्डा, लोकेश जिलकर, फिरोज दिंडोरे, सचिन पट्टेवार, उर्मी संस्थेचे राहुल शेंडे आदी उपस्थित होते. आधार संस्थेचे अध्यक्षा शुभांगी कलकेरी, शुभम कलकेरी यांनी पाहुण्यांची स्वागत केले. सूत्रसंचालन शुभदा केलकेरी यांनी केले. राम शिंदे यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सोनाली शिंदे, कोमलीका कलकेरी, अंबाबाई गड्डी आदींनी परिश्रम घेतले.

यावेळी कंपनीचे व्यवस्थापक सौम्या बक्षी बोलताना म्हणाले की, कंपनीने समुदायाच्या कल्याणासाठी असलेल्या वचनबद्धतेला अधोरेखित करते. आरोग्यासाठी आणि सुरक्षिततेसाठी योगदान देतील, विशेषत: सध्या शिक्षण आणि काळजी देण्याच्या त्यांच्या मिशनमध्ये आधार मतिमंद निवासी शाळेला पाठिंबा देऊ शकल्याबद्दल आनंद व्यक्त केला.

# तालुकास्तरीय परसबाग स्पर्धेत बाणेगाव झेडपी शाळा प्रथम

✔ सुराज्य/उत्तर सोलापूर

उत्तर सोलापूर तालुक्यातील बाणेगाव जिल्हा परिषद शाळेने प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत तालुकास्तरीय परसबाग स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकाविला आहे. द्वितीय क्रमांक क्रमांक बाळे केंद्रातील गुळवंची जिल्हा परिषद शाळा तर तृतीय क्रमांक कळमण केंद्रातील गावडी दारफळ येथील माळी वस्ती शाळेने पटकवला. उत्तेजनार्थ बक्षीस नान्नज केंद्रातील कारंबा जिल्हा परिषद शाळा, देगाव केंद्रातील देगाव मुली, आणि डोणगाव केंद्रातील तेलगांव शाळांनी पटकावला.

केंद्र शासनाने प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेअंतर्गत शाळांमध्ये परसबागा निर्माण करून सदर परसबागांमधून उत्पादित भाजीपाला व इतर पदार्थांचा समावेश शालेय पोषण आहारामध्ये करण्यात यावा, हा उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून उत्तर सोलापूर तालुक्यात परसबाग स्पर्धा घेण्यात आली. त्यामध्ये एकूण ८ केंद्रातील ८ शाळांनी यामध्ये सहभाग नोंदवला होता.

सदर परसबागेचे परीक्षण करण्यासाठी परीक्षक म्हणून उत्तर सोलापूर तालुक्यातील गटशिक्षणाधिकारी सिद्धेश्वर निंबर्गी, विस्तार अधिकारी बापुराव जमादार, प्रकल्प पर्यवेक्षिका माधवी शिंदे, कृषी अधिकारी सुरेश राठोड, घतर्गी, नंदिनी हिरेमठ यांनी काम पाहिले. यासाठी कैलास भडोले, महताब शेख यांनी परिश्रम घेतले.



### परसबागेतील भोपळा, टमाटे, चुका, पालकाने आली बहर

प्रथम क्रमांक मार्डी केंद्रातील बाणेगाव जिल्हा परिषद शाळेने आपल्या परसबागेत भोपळा, टमाटे, चुका, पालक, भेंडी, औषधी वनस्पती, मिरच्या, शेवगा, कोरफड, दुधी भोपळा, दोडके, घेवडा, तूर, पावटा, कोथींबीर, मेथी, आदी भाजीपाल्याने परसबाग फुलवली आहे.

## संक्षिप्त वृत्त...




### महाराष्ट्र चेंबरच्या २१ उद्योजकांचे शिष्टमंडळ इंडोनेशियाला रवाना

**सोलापूर :** इंडोनेशिया सरकारच्या आमंत्रणावरुन आणि भारत सरकारच्या सहकार्याने महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज, अँड ॲग्रीकल्चरच्या २१ उद्योजकांचे शिष्टमंडळ जकार्ता-इंडोनेशिया दौऱ्यासाठी रवाना झाले. दि. १९ ऑक्टोबरपर्यंत हा दौरा असल्याचे महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज, अँड ॲग्रीकल्चरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी ही माहिती दिली. या शिष्टमंडळाचे जकार्ता आंतरराष्ट्रीय विमानतळावर इंडोनेशियाचे भारतातील महावाणिज्यदूत जनरल एड्डी वर्दोयो यांनी स्वागत केले. या दौऱ्यात महाराष्ट्रात नवीन तंत्रज्ञान व भांडवली गुंतवणूक, महाराष्ट्रातून निर्यात वृद्धीसाठी नवीन क्षेत्रांची निवड या प्रमुख उद्देशाने इंडोनेशिया येथे विविध बैठकींचे आयोजन इंडोनेशिया आणि भारत सरकारने केले आहे. या दौऱ्यात शिष्टमंडळ ऋमॅग्नेटिक महाराष्ट्र या संकल्पनेचे सादरीकरण करणार आहे. बिझनेस ग्रुपसोबतबी टू बी मिटींग, इंडोनेशियाच्या काऊन्सुलेट कार्यालयासोबत बैठक, महाराष्ट्र चेंबर आणि इंडोनेशियामध्ये महत्त्वपूर्ण विषयांवर करार केले जाणार आहेत. जकार्ता येथील इंडियन दूतावास सोबत बैठक होणार आहे. ३८ वे ट्रेड एक्स्पो इंडोनेशिया २०२३ च्या उद्घाटनासाठी शिष्टमंडळ उपस्थित राहणार आहे. शिष्टमंडळात उद्योगपती एस. डी. परब, रमाकांत मालू, भरत येवला, सतीश लोणीकर, श्रीकांत पडोळ, संदीप नागोरी, नितीन इंगळे, मिलींद सांघवीकर, प्रमोद सांगोडे, भरत वखारिया, अर्जुन गायके, जयेश गायके, सुशीलकुमार सिंग, तरंजीतसिंग बग्गा, राधिका परब, अनिल परब, मिलींद बर्वे, मनोज झंवर, नंदकुमार शहा, नितीन भट आदींचा समावेश आहे.




### पूर्व विभाग मध्यवर्ती नवरात्र मंडळाच्या उत्सव समिती कार्यालयाचे उद्घाटन

**सोलापूर :** पूर्व विभाग मध्यवर्ती नवरात्र महोत्सव महामंडळाच्या नवरात्र उत्सवाच्या सुसूत्रता समितीच्या कार्यालयाचे उद्घाटन कामगार सेना कार्यालय, पद्मशाली चौक येथे संस्थापक अध्यक्ष विष्णू कारमपुरी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उत्सव समितीचे अध्यक्ष सोमनाथ बंदपट्टे, उपाध्यक्ष शहानवाज, कंपली शिवसेना उपशहर प्रमुख अमित भोसले, विठ्ठल कुराडकर, काळपगार, पंतुलू, गुरुनाथ कोळी, सुरेश शिंदे, विजय निली, प्रसाद जगताप, श्रीनिवास बोगा उपस्थित होते. आभारप्रदर्शन बालकिसन गोने यांनी केले.



### श्री समर्थ महिला पतसंस्थेचा २४ महिन्यात २५ कोटींचा व्यवसाय

**सोलापूर :** श्री समर्थ महिला पतसंस्था ही अवघ्या दोन वर्षाच्या कालावधीमध्ये अर्थात २४ महिन्यात २५ कोटी रुपयांचा व्यवसाय करणारी एकमेव पतसंस्था आहे. पतसंस्थेच्या ठेवी १६ कोटी ठेवी ९ कोटी कर्जे, भाग भांडवल ९० लाख व गुंतवणूक ८ कोटी रुपये इतके असल्याचे व्यवस्थापन मंडळाचे अध्यक्ष दीनकर देशमुख यांनी सांगितले. श्री समर्थ महिला पतसंस्थेचा दुसरा वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. त्यानिमित्त पतसंस्थेच्या कार्यालयात सत्यनारायण महापूजा आयोजित केली होती. लवकरच पतसंस्थेच्या शहरांमध्ये व ग्रामीण भागामध्ये शाखा विस्तार होईल. संस्थेने पहिल्याच वर्षी दहा टक्के सभासदांना लाभांश दिला. यावेळी चेअरमन नीता दीनकर देशमुख, संचालिका संगिता जाधव, सुवर्णा भोसले, मनिषा साठे, डॉ. मंजुषा ननवरे, वैशाली साळुंखे, व्यवस्थापन मंडळ उपाध्यक्ष महावीर जाधव, विलास कोरे, डॉ.प्रवीण ननवरे, सिद्राम हंगरगी, बापू महादेव साठे, संजय साळुंखे, प्रमोद यादव, संतोष भोसले, पिग्मी एजंट अजित चौधरी, आदिनाथ सुरवसे, सुनील मोरे उपस्थित होते.




### संवादातून मानसिक तणाव मुक्तीचा मंत्र; इनरव्हील क्लबचा उपक्रम

**कुर्डूवाडी :** संवादातून मनुष्याच्या समस्या सुटू शकतात. त्यामुळे संवाद कधीही खंडीत करू नका, आवाहन इनरव्हील क्लबच्या डी.सी.चेअरमन रचना मालपाणी यांनी केले. यावेळी आयोजित कार्यक्रमांतर्गत संवादातून मानसिक तणाव मुक्तीचा मंत्र दिला. इनरव्हील क्लबच्यावतीने डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन शाळेत जल शुद्धीकरण यंत्र बसवण्यात आले. त्याचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी आयोजित कार्यक्रमात अध्यक्ष सारिका दोशी, संस्थापक अध्यक्ष वैशाली शहा, विणा पूरवत, डॉ. सायली सुर्वे, निर्मला भांबुरे, सारिका ढवळसकर उपस्थित होते. यावेळी शीतल मुकणे यांच्या ऋणानुबंध या माहिती पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

### सेवालाल नगरच्या सरपंचपदी दीपाली राठोड बिनविरोध

**सोलापूर :** सेवालाल नगर (ता. उत्तर सोलापूर) ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी दीपाली राठोड यांची बिनविरोध निवड झाली. निवडणूक अधिकारी अविनाश गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली निवडीची सभा पार पडली. यावेळी तलाठी टी.पी.माने, मंडळ अधिकारी के. बी. भोसले, ग्रामसेवक भालचंद्र काळे उपस्थित होते. बैठकीस उपसरपंच खेमसिंग राठोड, माजी सरपंच कमला राठोड, कमलाबाई पवार, संजय वडजे, कलावती वडजे या सदस्यांसह पृथ्वीराज राठोड, लक्ष्मण राठोड, भानुदास राठोड, सीताराम राठोड, तुकाराम पवार, अर्जुन राठोड, भारत राठोड, श्रीकांत राठोड, चरणसिंग राठोड, सुनील पवार, अनिल राठोड, राजू चव्हाण, समशेर राठोड, मिथुन राठोड, विक्रम राठोड आदी उपस्थित होते.

# महापालिकेतील विविध योजनांच्या निधी आणि प्रलंबित विषयासंदर्भात शासनाकडे पाठपुरावा करणार : पालकमंत्री

**सुराज्य/सोलापूर**



सोलापूर शहरातील विविध विकास कामे व निधी प्रस्तावा तसेच प्रलंबित असलेल्या विषयांचा विषय मार्गी लावण्यासाठी केंद्र व राज्य शासनाकडे पाठपुरावा करण्यात येईल असे स्पष्ट करतानाच पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी बैठकीतूनच अवंती नगर येथील रेल्वे बोगद्याच्या कामासंदर्भात थेट रेल्वे राज्यमंत्र्याच्या कार्यालयातील अधिकाऱ्यांशी संपर्क साधला आणि हा विषय मार्गी लावण्याच्या सूचना दिल्या.

महापालिकेच्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले सभागृहात पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली सोलापूर महानगरपालिकेच्या विविध विषयांवर आढावा बैठक पार पडली. यावेळी आमदार सुभाष देशमुख, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, महापालिकेच्या आयुक्त शीतल तेली-उगले, अतिरिक्त आयुक्त निखिल मोरे, अतिरिक्त संदीप कारंजे, उपायुक्त मच्छिंद्र घोलप, उपायुक्त विद्या पोळ,नगर अभियंता लक्ष्मण चलवादी तसेच महानगरपालिकेचे अधिकारी उपस्थित होते.

शहरातील नियोजित उड्डाणपुलाच्या भूसंपादन, सोमापाच्या रस्त्याच्या प्रलंबित समस्यांसह छत्रपती शिवाजी महाराज पुतळा व परिसर सुशोभीकरण करणे इत्यादी बाबत चर्चा करण्यात आली.

देगाव येथील मलशुद्धीकरण केंद्रातून प्रक्रिया केलेले सांडपाणी एनटीपीसीला देण्याबाबत यावेळी चर्चा करण्यात आली. हा प्रकल्प महत्त्वाचा असून एन टी पी सी च्या टर्षरी प्रकल्पासाठी महानगरपालिका देगाव एस. टी. बी प्लांट येथे जागा देण्यास तयार आहे परंतु टर्सरी प्लांट एनटीपीसी ने करणे आवश्यक आहे. एस. टी. बी प्लांट मधील प्रक्रिया केलेले पाणी घेऊन एक ७२ श्रव पाईप लाईन चे पाणी शहरासाठी दिल्यास, सोलापूर शहराचा २०५० पर्यंतचा पाण्याचा प्रश्न मिटेल अशी माहिती आयुक्त यांनी पालकमंत्री यांना दिली. यावेळी पालकमंत्री यांनी यासंदर्भात पत्रव्यवहार करण्याच्या महापालिका आयुक्तांना सूचना दिल्या.

### जो निधी पाहिजे त्याची यादी द्या

उड्डाणपुलाच्या भूसंपादन सदर प्रकरणी शासनाचा हिस्सा १०१ कोटी पैकी ४२ कोटी प्राप्त झाले असून जवळपास ६० कोटी निधी मिळण्याबाबत महानगरपालिकेकडून पाठपुरावा करण्यात आला असून उर्वरित ६० कोटी रक्कम लवकरात मिळावे अशी मागणी आयुक्त यांनी केली. त्याबाबत पालकमंत्री यांनी महानगरपालिकेची संबंधित ज्या ज्या निधी हवे आहेत त्यांची यादी तयार करून शासनाकडे पाठवण्यासंदर्भात आदेश दिले.

### महापालिकेत बैठक घेणारे या टर्ममधील पहिले पालकमंत्री

२०१९ च्या या टर्म मध्ये आतापर्यंत चार पालकमंत्री सोलापूरला लाभले त्यानंतर चंद्रकांत पाटील हे पाचवे पालकमंत्री सोलापूरला मिळाले आहेत. दरम्यान यापूर्वी नियोजन भवन येथेच पालिकेच्या विषयासंदर्भात बैठका झाल्या आहेत. चंद्रकांत पाटील हे या टर्ममधील एकमेव पालकमंत्री आहेत की ज्यांनी थेट महापालिकेत येऊन विविध विषयांवर आढावा बैठक घेतली आणि सकारात्मक चर्चा करीत शासन स्तरावरील विविध विषयांसाठी पाठपुरावा करण्याचे स्पष्ट केले.

# बाळेतील पाणी गळती सुरुच

### पालिका म्हणते दसऱ्यानंतर काम सुरू होणार

**सुराज्य/सोलापूर**






गेल्या महिनाभरापासून बाळे येथील उजनीच्या मुख्य पाईपलाईनला दीड महिन्यांपासून सुरू असलेली पाणीगळती अद्यापही सुरू आह.

दसरा सणानंतर दुरुस्ती करणार असल्याची माहिती महापालिकेच्या पाणीपुरवठा अधिकाऱ्यांकडून देण्यात आली आहे.

सुमारे दीड महिनाभरापासून बाळे कॉर्नर येथे सोलापूरला पाणीपुरवठा करणाऱ्या उजनीच्या मुख्य पाईपलाईनला लागलेली पाणी गळती महापालिका

प्रशासनाच्या अक्षम्य दुर्लक्षामुळे आजतागायत सुरूच आहे. मुख्य पाईप लाईन मधून वाहणाऱ्या पाण्यामुळे महामार्गाच्या सर्व्हिस रोडवर खड्ड्यांचे व चिखलाचे साम्राज्य पसरले आहे. सोलापूर महानगरपालिका प्रशासनास वारंवार बाळे येथे होणाऱ्या या पाणीगळतीबाबत व रस्त्यांवर पडलेल्या खड्ड्यांबाबत सूचना देऊनही संबंधित पाणीपुरवठा व रस्ते दुरुस्ती विभागातील अधिकाऱ्यांनी या गंभीर बाबीकडे दुर्लक्ष केले आहे. महापालिका प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी केलेल्या दुर्लक्षामुळे बाळे येथील नागरिकांनी तीव्र नाराजी दर्शवली आहे. आधीच पाऊस काळ कमी झाला असून त्यात ही होणारी पाणी गळती सोलापूरकरांना पाणीटंचाई सामोरे जाण्यास लावणारी आहे. सोलापूर महापालिका प्रशासनाने तातडीने योग्य ती पाऊले उचलून मुख्य पाईपलाईनला सुरू असलेली ही पाणी गळती थांबवण्याची मागणी बाळे येथील स्थानिक नागरिकांनी केली आहे.

शहरात विविध ठिकाणच्या पाण्याच्या वॉल्वना व काही ठिकाणी मुख्य पाईपलाईनला लागलेल्या पाणीगळतीची संबंधित पाणीपुरवठा अधिकाऱ्यांना माहितीच नसते. होणारी पाणीगळती निदर्शनास आणून दिल्यानंतर देखील काही अधिकारी पाणीगळतीकडे जाणून-बुजून डोळेझाक करत असल्याचा आरोप वेगवेगळ्या ठिकाणच्या नागरिकांनी केला आहे.

**सण झाल्यानंतर होणारी पाणीगळती दुरुस्त करणार**

मुख्य पाईपलाईनला सुरू असलेली पाणीगळती दुरुस्त करण्यासाठी शटडाऊन घ्यावे लागणार आहे. सध्या सणासुदीचे दिवस आहेत. दसरा सण झाल्यानंतर ही पाणीगळती दुरुस्त करण्यात येईल

**- व्यंकटेश चौबे (उपअभियंता )**

## आ. शहाजीबापू पाटील यांच्या वाढदिनानिमित्त आज बैलगाडी शर्यत

**सुराज्य/सांगोला**



आ. शहाजीबापू पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त कोळे ग्रामस्थांच्यावतीने मंगळवार, दि. १७ रोजी स.१० वाजता कोळे येथील रेडामाई मंदिर, शेटफळे रोड येथे सर्वसाधारण 'अ' आणि 'ब' गट, आदत अशा तीन गटात बैलगाडी शर्यतीचे आयोजन केले आहे.

यावेळी खा. रणजीतसिंह नाईक-निंबाळकर, सत्कारमूर्ती आ. शहाजीबापू पाटील, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष माजी आमदार दीपक साळुंखे-पाटील, शिवसेना नेते भाऊसाहेब रुपनर, भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. बैलगाडी सर्वसाधारण 'अ' गटातील प्रथम क्रमांकासाठी १ लाख ११ हजार रुपयांचे बक्षीस असेल. द्वितीय ७५ हजार रुपये, तृतीय ५१ हजार रुपये अशी बक्षिसे आहेत. सर्वसाधारण 'ब' गटातून प्रथम क्रमांकासाठी ५१ हजार रुपये, द्वितीय ३१ हजार रुपये तृतीय २१ हजार रुपये, तर आदत गटात प्रथम क्रमांकासाठी ११ हजार रुपये, द्वितीय ७ हजार रुपये, तृतीय ५ हजार अशी बक्षिसे ठेवण्यात आली आहेत. बैलगाडी शर्यतीसाठी बैलगाडी मालकाचे फोटो, आधार कार्ड झेरॉक्स व दोन बैलाचे फोटो संयोजकांकडे जमा करावेत, असे आवाहन पंढरी आलदर, सयाप्पा सरगर, गंगाराम पुजारी, दत्ता सरगर, सचिन चोरमुले, दत्ता आलदर आदींनी केले आहे.

## नेताजी शिक्षण संकुलात आनंदोत्सव

**सुराज्य/सोलापूर**



नीलम नगर येथील नेताजी सुभाषचंद्र बोस शिक्षण संकुलात संस्थापक अध्यक्ष अण्णाराव कुंभार यांच्या हस्ते राजराजेश्वरी प्रशालेचे विज्ञान शिक्षक शितल पाटील व बालवैज्ञानिक रितू कलबुर्गी यांचा सत्कार करुन आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

नवी दिल्लीत राष्ट्रीय इन्सपायर अवार्ड योजनेतंर्गत विज्ञान प्रदर्शनात मांडलेल्या शैवाल क्लिनिंग मशीन या विज्ञान उपकरणांची राष्ट्रीय स्तरावरील अतिउत्कृष्ट साठ नावीन्यपूर्ण उपकरणांच्या गटात निवड झाल्याने संस्थापक अध्यक्ष अण्णाराव कुंभार यांच्या उपस्थितीत मुख्याध्यापक रविशंकर कुंभार, मुख्याध्यापक विश्वनाथ तंबाके, मुख्याध्यापिका वैशाली कुंभार, मुख्याध्यापिका विजयालक्ष्मी कुंभार, सेवानिवृत्त मुख्याध्यापक विजयकुमार हुल्ले, पर्यवेक्षक गौरीशंकर आळंगे, पालक अण्णा कलबुर्गी , संस्थेचे सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी वृंदानी आनंदोत्सव साजरा केला.

ताशांच्या गजरात स्वागत करण्यात आले.पालकांचा आनंद गगनात मावेनासा झाला होता. यावेळी बालवैज्ञानिक रितू कलबुर्गी व मार्गदर्शक शिक्षक शितल पाटील यांनी मनोगतातून दिल्लीतील राष्ट्रीय विज्ञान प्रदर्शनाचे अनुभव सांगितले. सूत्रसंचालन विश्वाराध्य मठपती यांनी केले.

## प्रताप मंडळातर्फे बाल क्रीडा स्पर्धेचे आयोजन

**सुराज्य/अकलूज**



सन १९७८ पासून कला, क्रीडा, सांस्कृतिक व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या शंकरनगर येथील प्रताप क्रीडा मंडळाच्या वतीने भव्य बाल क्रीडा स्पर्धेचे आयोजन केले असल्याची माहिती मंडळाच्या अध्यक्षा माननीय स्वरूपाराणी मोहिते-पाटील यांनी दिली.

रविवार, दि, २९ ऑक्टोबर २०२३ रोजी श्री विजयसिंह मोहिते पाटील क्रीडा संकुल अकलूज येथे एक दिवसीय बालक्रीडा स्पर्धेचे आयोजन केले आहे. या स्पर्धेमध्ये बालगट ते चौथीपर्यंतच्या विद्यार्थ्यांचा समावेश असणार आहे. या स्पर्धेत डोक्यावर चेंडू घेऊन पळणे, ८० मीटर धावणे,५०मिटर कमरेवर हात ठेवून उड्या मारत जाणे,५० मीटर लंगडी घालत जाणे, तीन पायाची शर्यत,५० मिटर पोत्यात पाय घालून चालणे असे स्पर्धेचे प्रकार आहेत. या स्पर्धेसाठी भव्य अशी बक्षिसे मंडळाच्या वतीने ठेवण्यात आली आहेत. स्पर्धेतील प्रत्येक खेळाडूस प्रमाणपत्र, स्केच पेन बॉक्स व बिस्कीट पुडा मंडळाच्या वतीने देण्यात येणार आहे.

या स्पर्धेसाठी क्रीडा संकुल येथे ६ मैदाने असून ४२ पंच काम पाहणार आहेत. स्पर्धा नियोजन पद्धतीने होण्यासाठी २३ समित्यातून मंडळाचे सदस्य कार्यरत आहेत. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी प्रति विद्यार्थी ५०/- रुपये अशी नाममात्र प्रवेश फी ठेवण्यात आली आहे. या स्पर्धेमध्ये नाव नोंदणी करण्यासाठी रमेश गायकवाड ९८६०८७६५३५ व प्रशांत जगताप ९६३७१७४१६७ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन पोपटराव भोसले-पाटील यांनी केले आहे. यावेळी मंडळाचे सर्व संचालक व सदस्य उपस्थित होते.

## वटवृक्ष मंदिरात घटस्थापनेने नवरात्रौत्सवास प्रारंभ

**सुराज्य/अक्कलकोट**



श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरात नवरात्र महोत्सवानिमित्त देवींची स्थापना आणि घटस्थापना करण्यात आली. यानंतर मंदिर समितीचे चेअरमन व नगरसेवक महेश इंगळे यांच्या हस्ते आणि मंदार पुजारी, व्यंकटेश पुजारी यांच्या मंत्रोच्चारात देवींची आरती झाली.

या नवरात्र महोत्सव कालावधीत देवस्थानच्यावतीने तीन दिवसीय देवी महात्म्य या पोथींचे पारायण केले जाते. कोजागरी पौर्णिमेस देवस्थानकडून महानैवेद्य दाखवून दूधाचा प्रसाद म्हणून वाटप केले जाते. याप्रसंगी आत्माराम घाटगे, महेश गोगी, उज्वला सरदेशमुख, संपतराव शिंदे, प्रा.शिवशरण अचलेर, बंडेराव घाटगे, अमर पाटील, स्वामीनाथ लोणारी, श्रीशैल गवंडी, प्रसाद सोनार, सागर गोंडाळ, महेश मस्कले, श्रीकांत मलवे, अविनाश क्षीरसागर, सिद्धाराम कुंभार, प्रदीप हिंडोळे, संतोष जमगे आदींनी देवी मातेचे दर्शन घेतले.

## भाजप शहर अल्पसंख्याक मोर्चाची कार्यकारणी जाहीर

**सोलापूर :** भाजप सोलापूर शहर अल्पसंख्याक मोर्चाची कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. अल्पसंख्याक मोर्चाचे प्रदेश अध्यक्ष ईद्रीसभाई मुलतानी यांच्या आदेशाने सोलापूर शहर अल्पसंख्याक मोर्चा शहर कार्यकारणी भाजपा अल्पसंख्याक सोलापूर शहराध्यक्ष जाकिर सगरी यांनी जाहीर केली.

नूतन कार्यकारिणी निवडल्याचे पत्र भाजपा शहर अध्यक्ष नरेंद्र काळे, अल्पसंख्याक मोर्चा प्रदेश सचिव तथा शहर निरीक्षक ॲड. जहीर चौधरी, राज्य कार्यकारिणी सदस्य डॉ. रफीक सय्यद यांच्या हस्ते देण्यात आले. नवीन कार्यकारिणी पुढीलप्रमाणे- उपाध्याक्ष हाजी अकिल नालवार, ऐजाज मोहंमद सय्यद, अजीज हसन, सय्यद, शफीक युनुस तांबोळी. सरचिटणीस जिशान सलीम सय्यद, अब्दुल कदीर ईनामदार, हाजी सज्जाद हुसेन रचभरे, हाजी अखील अहेमद नालवार. सचिव ताजोद्दीन महामूद बानकरी.

# महापालिकेतील लिपिक लक्ष्मण राठोड यांना सेवेतून काढले

**सुराज्य/सोलापूर**

महापालिकेतील कनिष्ठ श्रेणी लिपिक लक्ष्मण सोमा राठोड हे पूर्वकल्पना न देता अथवा रजेचा अर्ज सादर करुन रजा मंजूर करून न घेता कामावर गैरहजर राहिल्याने महानगरपालिकेच्या सेवेतून दि. १३ मे २०१३ पासून काढून टाकण्यात येत आहे,असे आदेश महापालिका अतिरिक्त आयुक्त निखिल मोरे यांनी काढले आहेत.

महापालिकेतील कनिष्ठ श्रेणी लिपिक लक्ष्मण राठोड हे पूर्वकल्पना न देता अथवा रजेचा अर्ज सादर करुन रजा मंजूर करून न घेता दि. १३ मे २०१३ पासून कामावर गैरहजर आहेत. त्यांच्या गैरहजेरींमुळे सोपविण्यात आलेल्या कार्यालयीन कामकाजामध्ये अडचणी निर्माण झाले असून कार्यालयीन शिस्तीस बाधा पो-होचली आहे. लक्ष्मण राठोड हे यापूर्वीही कामावर गैरहजर असून वेळोवेळी विनापरवाना गैरहजर राहण्याच्या गैरवर्तनासाठी नोटीस बजाविणे पूर्वी सेवा पुस्तक विभाग, सा.प्र.वि यांचेकडून सेवा पुस्तक बाबत माहिती घेतली असता राठोड यांनी सेवा पुस्तक भरले नसल्याचे निर्दशनास आले. त्यामुळे राठोड यांना नोटीस बजावता आली नाही. लक्ष्मण राठोड दि. ८ एप्रिल २०२२ रोजी स्वत: अर्ज करुन कामावर घेण्याची विनंती केली आहे. ९ वर्ष एवढया दिर्घकालीन गैरहजेरीसाठी शासनाचे दि. १० ऑक्टोबर २०१७चे निर्णयानुसार शिस्तभंगाची कारवाई करण्यापूर्वी दि.२७ जून २०२२ रोजी ज्ञा-पनासह दोषारोपत्र बजावण्यात आले. सदर दोषारोपपत्रास त्यांनी केलेला खुलासा असमाधानकारक असल्याने त्यांच्या महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) १९७९ चे नियम ८ अन्वये विभागीय चौकशी कार्यन्वीत करण्यात येवून दि. २० सप्टेंबर २०२२ चे आदेशान्वये चौकशी अधिकारी व सादरकर्ता अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली.

विभागीय चौकशी मध्ये निसर्ग न्यायतत्वानुसार हजर राहून आपला खुलासा सादर करणेकामी संधी देण्यात आली. विनापरवाना गैरहजर प्रकरणी नियुक्त चौकशी अधिकारी यांनी विभागीय चौकशीची कार्यवाही पूर्ण करुन प्रशासनाने ठेवलेले दोषारोप सिध्द होत असल्याचा अहवाल दि.६ फेब्रुवारी २०२३ ने सादर केला आहे.

वांरवार विनापरवाना गैरहजर राहण्याच्या वर्तनात कोणतीही सुधारणा दिसून येत नसल्याचे दोषारोप सिध्द झाल्याने लक्ष्मण राठोड यांच्या गैरवर्तनासाठी महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ५६ (२) (ग) च्या तरतुदींनुसार पुढे नोकरी मिळण्यास अपात्र होणार नाही अशा प्रकारे महानगरपालिकेच्या सेवेतून दि. १३ मे २०१३ पा-सून काढून टाकण्यात येत आहे, असे आदेशात म्हटले आहे.

## थोडक्यात महत्त्वाचे



गणराज तरुण नवरात्र महोत्सव मंडळाची शक्तीदेवीची मिरवणूक नगरसेवक विनोद भोसले व मंडळाचे अध्यक्ष शैलेश कांबळे यांच्या नेतृत्वाखाली काढण्यात आली.




### नातेपुते प्राथमिक शाळेत आजी-आजोबा दिन साजरा

**नातेपुते** : नातेपुते एज्यूकेशन सोसायटी संचलित प्राथमिक विभागात आजी-आजोबा दिन हा अनोखा उपक्रम साजरा करण्यात आला. यावेळी विविध खेळांच्या स्पर्धेत नातवांसोबत आजी आजोबाही सहभागी होत मनसोक्त आनंद लुटला. अनेकांना आपल्या बालपणीचे दिवस आठवून 'लहानपण देगा देवा, मुंगी 'साखरेचा रवा' या अभंगातील ओळींचा खऱ्याअर्थाने प्रत्यय आला. प्राथमिक विभागात आजी- आजोबा दिन हा कार्यक्रम आयोजित केला होता. प्रत्येक कुटुंबातील वयस्क आजी-आजोबांना शाळेमध्ये आमंत्रित केले होते. जवळपास २०० ते२५० वयस्कर आजी आजोबा या सोहळयाला उपस्थित होते. प्रारंभी त्यांचे विद्यार्थ्यांकडून औक्षण करत गुलाबपुष्प देऊन विद्यार्थ्यांनी आशीर्वाद घेतले. आजी-आजोबांसाठी संगीत खुर्ची, लिंबू चमचा असे आनंददायी खेळ घेण्यात आले. यासाठी इयत्ता चौथी वर्गातील मुलांनी आजी आजोबा सोबतचे कुटुंब विषयी नाटिका, गीत सादर केले. यासाठी इयत्ता चौथीचे शिक्षक मारुती भांगरे, सुरेखा कुंभार, मनोज पवार, कांचन नाळे यांनी परिश्रम घेतले. याप्रसंगी चेअरमन धैर्यशील देशमुख, व्हा.चेअरमन संतोष काळे, केंद्रप्रमुख प्रशांत सरूडकर उपस्थित होते. यासाठी मुख्याध्यापक कुंडलिक इंगळे, संजय जाधव, दादासाहेब देवकाते, मनोज पवार, अभिजित वाळके, किशोर भरते, मारुती भांगरे, रवी ननवरे, सुरेखा कुंभार, वर्षा बडवे, कांचन नाळे, विनायक चांगण यांनी परिश्रम घेतले.



### चिखलीत जागतिक हात धुवा दिवस सारजा


**चिखली** : मोहोळ तालुक्यातील चिखली ग्रामपंचायत क्षेत्रात ''हात धुवा दिवस '' अर्थात वर्ल्ड हँडवॉश डे साजरा करण्यात आला. यावेळी नागरिकांना हात कसे धुवावे याचे शास्त्रयोक्त पद्धतीने प्रात्याक्षिक करून दाखविण्यात आले. स्वच्छतेची शपथ देण्यात आली. ग्रामसेवक माधुरी वसेकर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि जिल्हा परिषदेच्या नियंत्रणाखाली स्वच्छ भारत मिशन अंतर्गत हा उपक्रम राबविण्यात आला. रोजच्या दैनंदिन जीवनात स्वच्छ हात धुणे ही क्रिया आजार होण्यापासून रोखत असते. नागरिकांना हात धुण्याचे महत्व पटावे यासाठी जागतिक स्तरावर १५ ऑक्टोबर हा दिवस वर्ल्ड हँडवॉश डे म्हणून 'साजरा केला जातो. या दिवसाचे औचित्य साधून ग्रामपंचायत स्तरावर हात धुण्याचे प्रात्याक्षिक कार्यक्रम आयोजित केला होता. यामध्ये गावातील लोकप्रतिनिधी, नागरिक, ग्रामपंचायत कर्मचारी, महिला व बाल विकास विभागाच्या अंगणवाडी सेविका, आरोग्य विभागाच्या आशा कार्यकर्त्या यांनी प्रत्येक्ष सहभाग घेतला. तसेच जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थाना हात कसे धुवावे याचे धडे दिले. हा दिवस यशस्वी करण्यासाठी गावपातळीवर सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामपंचायत कर्मचारी यांनी विशेष मेहनत घेतली.

### यंत्रमाग कामगारांना दिवाळीपूर्वी दहा टक्के बोनस देण्याची मागणी

**सोलापूर** : शहरातील यंत्रमाग उद्योगात सुमारे ७० ते ८० हजार कामगार असून यात पुरुष व महिलांचा समावेश आहे हे कामगार लूम चालविणे, जॉबर मुनीम, डबलिंग, टॉवेल, सफाई गाठी मारणे, कोम मशीन, चालवणे शिलाई कामगार व इतर कामे करणारे कामगार असून त्या सर्व कामगारांना दिवाळीपूर्वी दहा टक्के बोनस देण्यात यावा अशा मागणीचे निवेदन शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष प्रणित महाराष्ट्र कामगार सेनेच्यावतीने सहाय्यक कामगार आयुक्तांकडे देण्यात आले. यावेळी विष्णू कारमपुरी(महाराज) महाराष्ट्र कामगार सेनेचे प्रदेशाध्यक्ष यांच्या नेतृत्वाखाली यंत्रमाग कामगारांना बोनस देण्यासाठी निवेदन देणाऱ्या शिष्टमंडळात विठ्ठल कुराडकर, जर्गीस मुल्ला, शरणाप्पा जंगले, गोवर्धन मुदगल, हरिभाऊ दूध्याल व यंत्रमाग कामगारांचा समावेश होता.

## निधन वृत्त

### इरणप्पा पाटील



**सोलापूर** : सिध्देश्वर सहकारी साखर कारखान्याचे माजी व्हाईस चेअरमन इरणप्पा रेवणसिद्ध पाटील यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ९० वर्षांचे होते. त्यांची अंत्यायात्रा मंगळवार, दि. १७ ऑक्टोबर २०२३ सकाळी १० वाजता बाणेगाव येथील राहत्या घरापासून निघणार आहे. ते बाणेगाव सहकारी सोसायटीचे माजी चेअरमन, माजी तंटामुक्त समितीचे अध्यक्षदेखील होत.


# आता झेडपी शाळांना ग्रंथालयासाठी प्रत्येकी शंभर पुस्तके उपलब्ध होणार

- शाळा तिथे ग्रंथालयाची उभारणी करणार
- उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांची ग्वाही

सुराज्य/सोलापूर

**जिल्हा परिषदेच्या ज्या शाळांना ग्रंथालय उपलब्ध नाही. अशा सर्व शाळांची यादी शिक्षण विभागाने तयार करून ग्रंथालयासाठी जागा उपलब्ध करून द्यावी. या सर्व शाळांना ग्रंथालयासाठी किमान शंभर पुस्तके तत्काळ उपलब्ध करून देण्यात येतील, अशी ग्वाही उच्च व तंत्रशिक्षण, वस्त्रोद्योग व संसदीय कार्यमंत्री तथा पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली.**





नियोजन समितीच्या सभागृहात आयोजित जिल्हा वार्षिक योजना सन २०२२-२३ व २३-२४ चा जिल्हा परिषद यंत्रणांच्या विविध विभागांच्या आढावाप्रसंगी पालकमंत्री चंद्रकांत पाटील बोलत होते.

यावेळी आ. सुभाष देशमुख, आ. सचिन कल्याणशेट्टी, आ. समाधान आवताडे, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी इशाधीन शेळकंदे, महसूल उप जिल्हाधिकारी विठ्ठल उदमले, सहाय्यक नियोजन अधिकारी पुंडलिक गोडसे उपस्थित होते.

जिल्हा वार्षिक योजना सन २०२२-२३ च्या कामांचे कार्यारंभ आदेश ऑक्टोबर-२०२३ अखेर तर सन २०२३-२४ ज्या कामांचे कार्यारंभ आदेश डिसेंबर-२०२३ अखेरपर्यंत देण्यात यावेत. जानेवारी २०२४ अखेर लोकसभेसाठी आचारसंहिता लागण्याची शक्यता आहे. नोव्हेंबर-डिसेंबर २०२३ मध्ये ग्रामपंचायत निवडणुका होत आहेत. त्यामुळे सर्व संबंधित यंत्रणांनी त्यांना मंजूर असलेल्या निधीतून कामांची प्रक्रिया पूर्ण करून घेणे आवश्यक असल्याने संबंधित यंत्रणांनी याबाबत दक्षता घ्यावी, असे निर्देश पालकमंत्री पाटील यांनी दिले.प्रारंभी जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार यांनी जिल्हा वार्षिक योजना सन २०२२-२३ माहे मार्च २०२३ आखेर झालेल्या खर्चाची माहिती बैठकीत सादर केली. मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे यांनी जिल्हा परिषद जिल्हा परिषद जिल्हा वार्षिक योजना सन २०२२- २३ व २३ -२४ अंतर्गत मंजूर असलेला सर्व निधी विहित कालावधीत १००% खर्च करेल याबाबत आश्वासित केले. प्रारंभी पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांचे जिल्हा प्रशासनाच्यावतीने जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सोलापूर जिल्ह्याचे कॉफी टेबल बुक देऊन स्वागत केले.

#### मुख्याध्यापकांनी पुस्तकांची यादी तयार करावी

पालकमंत्री पाटील पुढे म्हणाले की, शिक्षण विभागाने शाळेच्या मुख्याध्यापकांना तत्काळ किमान शंभर पुस्तकाची यादी तयार करण्यास कळवावे व ती सर्व पुस्तके आपण स्वतः तत्काळ खरेदी करून देणार असून, प्रत्येक शाळेत ग्रंथालय सुरू झाल्यानंतर विद्यार्थ्यांना ती पुस्तके शाळेत, वाचण्यासाठी घरी रोटेशन पद्धतीने घेऊन जाण्याची परवानगी द्यावी, अशा सूचना त्यांनी दिल्या.

#### २२ शाळांमध्ये १० प्रकारचे विविध कार्यक्रम

जिल्हा परिषदेच्या ३५ शाळा महापालिकेच्या हद्दपार भागात आलेले आहेत. त्या सर्व शाळांच्या देखभाल व दुरुस्तीसाठी आवश्यक असल्याने ते नियोजन समितीमध्ये तत्काळ उपलब्ध करण्यात येईल, असे पालकमंत्री पाटील यांनी सांगून जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील किमान दोन भाषेचे एकूण २२ शाळांमध्ये दहा प्रकारचे विविध कार्यक्रम आयोजित करावे. त्यासाठी आवश्यक असलेला प्रति शाळा दीड ते दोन लाखाचा निधी, जिल्ह्याच्या प्रत्येक शाळेत, स्वच्छतागृह व अन्य पायाभूत सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सीएसआर फंडातून उपलब्ध केला जाईल.

## सोलापूरकरांची संध्याकाळ 'गाणी तुमची आमची'मुळे सुरेल

सिद्धेश्वर बँकेच्या ४१ व्या शारदोत्सव व्याख्यानमालेस उत्साहात प्रारंभ

सुराज्य/सोलापूर

मराठी-हिंदीतील अजरामर गीतांच्या मैफिलीने सोलापूरकरांची सोमवारची संध्याकाळ सुरेल, आनंददायी केली. निमित्त होते सिध्देश्वर बँक सेवक सांस्कृतिक मंडळाच्या वतीने हुतात्मा स्मृति मंदिरात आयोजित शारदोत्सव व्याख्यानमालेचे.




सोलापुरातील लोकप्रीय 'शिवरंजनी' वाद्यवृंदाने यंदाच्या ४१ व्या व्याख्यानमालेचे श्रवणीय असे पहिले पुष्प गुंफले. सुहास सदाफुले, उन्मेष शहाणे, विश्वास शाईवाले, राजगंधर्व सदाफुले, वीणा बाद्रायणी, धनश्री देशपांडे यांच्या सुरेल स्वरांनी सजलेली गाणी तुमची आमची रसिकांना भावली. त्यांना समीर जैन, उमेश मोहोळकर, अमीर हुंडेकरी, करण भोसले, सन्मीत जैन, सिध्दार्थ दणाणे या वाद्यवृंदाने अप्रतिम साथसंगत केली. माधव देशपांडे यांच्या निवेदनाने मैफिलीत बहारदार रंग भरले.

तत्पूर्वी प्रिसीजन कॅमशाफ्ट लिमिटेडचे चेअरमन यतीन शहा, सिध्देश्वर बँकेचे अध्यक्ष प्रकाश वाले, उपाध्यक्ष नरेंद्र गंभिरे यांच्या हस्ते व्याख्यानमालेचे उद्‌घाटन झाले. यावेळी चंद्रकांत रमणशेट्टी, ॲड. एम. के. पाटील, ॲड. धानय्या चिवरी, सी.ए. राजन रिसबूड, तुकाराम काळे, प्रकाश हत्ती, अशोक लांबतुरे, भारती शिवदारे, सुचेता थोबडे, रुपाली बिराजदार, डॉ. सिध्देश्वर वाले, अण्णासाहेब कोतली, बाळासाहेब भोगडे, राज पाटील उपस्थित होते. स्वागत, प्रास्ताविक सरव्यवस्थापक राम शर्मा यांनी केले.

## हिराचंद नेमचंद, वालचंदची विजयी सलामी; वालचंद प्रीमियर लीग क्रिकेटला सुरुवात

सुराज्य/सोलापूर

हिराचंद नेमचंद, वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाने वालचंद प्रीमियर लीग महाविद्यालयीन क्रिकेट स्पर्धेत विजयी सलामी दिली.




वालचंद इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजीच्या स्थापनेला चाळीस वर्षे पूर्ण झाल्याप्रित्यर्थ ही स्पर्धा रेल्वेच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर क्रीडा संकुलात सुरू झाली. पहिल्या सामन्यात वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीने व्ही.व्ही.पी इंजिनीअरिंग कॉलेजवर मात करून ४६ धावांनी मात केली. अष्टपैलू तेजस जहागीरदार सामनावीर ठरला. सायंकाळी झालेल्या दुसऱ्या सामन्यात हिराचंद नेमचंद कॉलेज ऑफ कॉमर्स कॉलेजने वालचंद कॉलेज ऑफ आर्ट्स अँड सायन्सवर सहा गडी राखून विजय मिळविला. या सामन्यात अष्टपैलू जैद नदाफ हा सामन्याचा मानकरी ठरला.

या स्पर्धेत आठ महाविद्यालयांचा सहभाग घेतला आहे. त्यामधून दोन गट तयार केले आहेत. हे सामने प्रथम साखळी व नंतर बाद पद्धतीने होतील. स्पर्धेचे उद्‌घाटन वालचंद शिक्षण समूहाचे मानद सचिव डॉ. रणजित गांधी आणि विश्वस्त भूषण शहा यांनी केले.

याप्रसंगी विश्वस्त पराग शहा, प्राचार्य डॉ. विजय आठवले, प्राचार्य डॉ. सत्यजित शहा, प्राचार्य डॉ. अश्विन बोंदार्डे, क्रीडा समन्वयक डॉ. सचिन देशमुख उपस्थित होते. यासाठी डॉ. किरण चौगुले. प्रा. राहुल हजारे. प्रा. सम्प्रीत पटेल हे परिश्रम घेत आहेत.

## इच्छा भगवंताच्या शक्तीदेवीची मिरवणुकीने प्रतिष्ठापना

सुराज्य/सोलापूर

आई राजा उदो.. उदो... सदानंदी उदो...चा जयकार करीत इच्छा भगवंताची नवरात्र महोत्सव मंडळाच्या वतीनं संबळ आणि हलगीच्या निनादात मोटार सायकल रॅली काढत शक्ती देवीची प्रतिष्ठापना मिरवणूक अमाप उत्साही वातावरणात काढण्यात आली.



इच्छा भगवंताची बहुउद्देशीय सामाजिक संस्था संचलित इच्छा भगवंताची नवरात्र महोत्सव मंडळाची शक्ती देवी प्रतिष्ठापना मिरवणूक हलगीचा कडकडाट, संबळाचा निनाद आणि आई राजा उदे उदे च्या जयघोषात शक्ती देवीची जागर करीत शक्ती देवीची प्रतिष्ठापना मिरवणूक काढण्यात आली. रविवारी रेल्वे स्टेशन परिसरातील पोस्ट ऑफिस येथून निघाली. महात्मा गांधी पुतळा मार्गे मोदी, रामवाडी, सेटलमेंट आदी भागातून निघून सेटलमेंट येथे मोठ्या भक्तीमय व मंगलमय वातावरणात आदिशक्तीचा जागर करत शक्ती देवीची प्राणप्रतिष्ठापना धार्मिक विधिवत पुजा करून शक्तीदेवीची स्थापना करण्यात आली. जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार दीपक साळुंखे, पालिका अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, सदर बाजार पोलिस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र क्षीरसागर, सलगर वस्ती पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक चंद्रकांत वाबळे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सचिव संतोष पवार, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे युवक शहराध्यक्ष सुहास कदम, सिध्देश्वर सहकारी बँकेचे संचालक सिध्देश्वर मुनाळे, मंडळाचे संस्थापक लक्ष्मण मामा जाधव, मंडळाचे कार्याध्यक्ष माजी गटनेते किसन जाधव, नागेश गायकवाड, उत्सव अध्यक्ष अंबादास गायकवाड, इरफान शेख, मोहन जाधव, प्रदेश सरचिटणीस चेतन गायकवाड, मोहन जाधव, विष्णू गंगुल, शितल गायकवाड, जनकल्याण मल्टीस्टेट चे चेअरमन राजेंद्र हजारे शिवराज जाधव सांगोल्याचे बबलू भैया, फारुख शेख, सचिन उर्फ अक्षय जाधव,संतोष गायकवाड, निलेश कांबळे, उमेश जाधव,हरीश तेलुगु, अमोल लकडे, सागर कांबळे, सचिन पिसे, नईम अड्डेवाले, दर्शन दुबे, विजू भाऊजी, विनोद भाऊजी, नितीन भाऊजी, तुषार गायकवाड, विशाल गायकवाड, बक्सु सय्यद,संजू गायकवाड सचिन आंगडीकर, माऊली जरग, ऋषी येवले, माणिक कांबळे, वसंत कांबळे फुलगप्पा राम मिस्त्री, आप्पासाहेब बिलगुडे,आदींसह मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते. मंडळाचे यंदाचे २४ वे वर्ष आहे. पुढील २५ वर्षा निमित्ताने नवरात्र महोत्सवाच्या काळात महिला भगिनींसाठी विविध समाज उपयोगी कार्यक्रम राबविण्यात येणार आहे तसेच येणाऱ्या वर्षभराच्या काळामध्ये इच्छा भगवंताची नवरात्र मंडळच्यावतीनं सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याचे किसन जाधव यांनी सांगितले.

## उजनी धरणातील उपलब्ध पाण्याचे योग्य नियोजन करा : पालकमंत्री

सुराज्य/सोलापूर

उजनी धरण पाणलोट क्षेत्रामध्ये पाऊस कमी प्रमाणात झाल्याने उजनी धरणाच्या पाणी पातळीत घट झाली आहे. त्याअनुषंगाने नागरिक व जनावरांसाठी पिण्याच्या पाण्याचे योग्य नियोजन करण्यात यावे, अशा सूचना पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिल्या.

नियोजन भवन येथे उजनी प्रकल्पातील उपलब्ध पाण्याच्या नियोजनाबाबत चर्चा आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी आ. बबनदादा शिंदे, सुभाष देशमुख, समाधान आवताडे, सचिन कल्याणशेट्टी, रणजितसिंह मोहिते-पाटील, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, महसूल उपजिल्हाधिकारी विठ्ठल उदमले, जलसंपदाचे अधीक्षक अभियंता धीरज साळी यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

उजनी धरण जिल्ह्यासाठी वरदान ठरले आहे. उजनी धरणातून जिल्ह्यात सिंचनासाठी तसेच सोलापूर शहराला पिण्यासाठी पाणी सोडले जाते. यावर्षी उजनी धरणातील पाणी पातळी ६०.६६ टक्के असल्याने उपलब्ध पाण्याबाबत सर्वांच्या गरजा लक्षात घेऊन योग्य नियोजन करावे. धरण परिसरातील अनधिकृत पाण्याचा उपसा होणार नाही याबाबत जलसंपदा विभागाने दक्षता घ्यावी अशा सूचनाही पालकमंत्र्यांनी यावेळी दिल्या.

या प्रकल्पावर सीना माढा उपसा सिंचन योजना, भीमा सीना जोड कालवा, दहिगाव सिंचन योजना तसेच चार मोठे प्रकल्प, सात मध्यम प्रकल्प, ५६ लघु प्रकल्प व ९० कोल्हापूर पद्धतीचे बंधारे आहेत. या प्रकल्पातून उपलब्ध पाण्याचे नियोजन करण्यात आले असल्याचे जलसंपदा विभागाचे अधिक्षक अभियंता धीरज साळी यांनी यावेळी सांगितले.

'अनकढाळ'च्या टोल माफीसाठी बहुजन संघटेनेने केले होते आंदोलन

# विनंतीनंतर आंदोलन माघार घेतल्याने वाहतूक पूर्ववत

सुराज्य/सांगोला

**बहुजन भारत सामाजिक संघटनेच्यावतीने नितीन रणदिवे आणि त्यांच्या मित्र परिवाराने अनकढाळ टोलनाका येथील २५ किलोमीटर परिसरातील वाहनांना टोलमाफ करावी, या मागणीसाठी रविवारी सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास टोल नाक्यावर आंदोलन सुरू केले. जोपर्यंत मागण्या मान्य होणार नाही, तोपर्यंत लढा सुरू राहील, अशी आक्रमक भूमिका घेऊन काही कालावधीसाठी टोल नाका बंद ठेवण्यात आला होता.**



अनकढाळ येथील २५ किलोमीटर परिसरातील वाहनधारकांना टोल नाक्यावर टोल न आकारता मी माफ करावी, या मागणीसाठी बहुजन भारत सामाजिक संघटनेच्यावतीने पुकारण्यात आलेले आंदोलन विनंतीनंतर तात्पुरत्या स्वरुपात माघारी घेण्यात आले.

आंदोलनाच्या मागणीला न्याय देण्याचा प्रयत्न केला जाईल, दरम्यान तात्पुरत्या स्वरूपात हे आंदोलन माघारी घ्यावे, अशी राष्ट्रीय महामार्गावरील संबंधित अधिकाऱ्यांनी विनंती केल्यानंतर सदरचे आंदोलन माघारी घेतले. त्यानंतर पोलिसांच्या मदतीने वाहतूक व्यवस्था पूर्ववत सुरळीत सुरू करण्यात आली. यावेळभ संबंधितक प्रशासनास मागणीचे निवेदन देण्यात आले. यावेळी या निवेदनाचा विचार करून निर्णय घेऊ. केंद्र व राज्य शासनाला निवेदन पाठवू, असे प्रशासनातर्फे सांगण्यात आले.

दरम्यान, राष्ट्रीय महामार्गाच्या अधिकाऱ्यांनी टोल नाका परिसरात हजेरी लावली. आंदोलनाच्या मागण्याबाबत दिल्लीतील प्रमुख कार्यालयामध्ये सविस्तर चर्चा करून योग्य तो न्याय देण्याचा प्रयत्न केला जाईल. परंतु सध्या सुरू असलेले आंदोलन मागे घ्यावे अशी विनंती केली. या विनंतीला मान देऊन आंदोलकांनी तात्पुरत्या स्वरूपात आंदोलन मागे घेतले. परंतु, येत्या काळात मागण्या मान्य न झाल्यास हे आंदोलन पुन्हा पेटून उठेल, असा इशाराही नितीन रणदिवे यांनी दिला.

या आंदोलनास शेतकरी कामगार पक्षाचे नेते डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी भेट देऊन आंदोलनाला पाठिंबा दिला. यावेळी होलार समाज संघटनेचे अध्यक्ष शिवाजीराव जावीर, दीपक ऐवळे, गुळींग-गोडसे यांनीही मागणी मान्य न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला. तसेच आमदार, खासदार यांचीही भेट घेऊन त्यांनाही निवेदन देणार असल्याचे रणदिवे यांनी सांगितले. यावेळी काही काळ वाहतूक व्यवस्था ठप्प झाली होती. पोलीस उपनिरीक्षक पोपट काशींद आणि त्यांच्या पथकाने आंदोलन माघारी घेतल्यानंतर वाहतूक पूर्ववत सुरू केले.

## संक्षिप्त वृत्त...

### फुकटची दारु दिली नाही; एक्साईज डिपार्टमेंटच्या अधिकाऱ्याकडून मारहाण

**पुणे :** पुण्यात दिवसेंदिवस गुहेगारीचं प्रमाण वाढत चाललं आहे. कोयता गँग, बलात्कार, हत्या आणि मारहाण अशा बऱ्याच प्रकारच्या घटना या शहरासह संपूर्ण जिल्ह्यात देखील घडताना आपण पाहत आहोत. पुणे जिल्ह्याला क्राईम सिटी म्हणून देखील आता ओळखलं जात आहे. याचदरम्यान, शहरात एक धक्कादायक घटना घडली आहे. एक्साईज डिपार्टमेंटच्या अधिकाऱ्याने मारहाण केल्याची घटना घडली आहे.

### ‘अ बिलियन फिल्म्स फॉर ‘अ’ बिलियन फॅन्स’ कॅम्पेन

**मुंबई :** जागतिक स्तरावर क्रिकेटसोबतची भागीदारी आणखी मजबूत करत, सीग्रामचा रॉयल स्टॅग आपल्या प्रेक्षकांसाठी एआय-चालित ’अ बिलियन फिल्म्स फॉर अ बिलियन फॅन्स’ कॅम्पेन घेऊन येत आहे. या मोहिमेत क्रिकेट जगतातील तीन चेहरे दिसणार आहेत, कर्णधार रोहित शर्मा, जसप्रीत बुमराह आणि सूर्य कुमार यादव. क्रिकेटची भावना लक्षात घेऊन, तरुण क्रिकेट चाहत्यांशी जोडण्याचे ब्रँडचे उद्दिष्ट आहे. यातही बहुतेक जण त्यांचा पहिला विश्वचषक प्रौढ म्हणून पाहत आहेत त्यांच्यावर ब्रँडने लक्ष केंद्रित केले आहे.

### बोगस फळपीक विमा लाटणाऱ्यांना दणका; साडे तेरा कोटी जप्त

**पुणे :** फळपिकांची लागवड केली नसतानाही विमा लाटला, दुसऱ्या शेतकऱ्याच्या शेतीवर भाडेकरार दाखवून त्यांच्या नकळत विमा काढला, फळपीकाच्या लागवडीपेक्षा अधिक क्षेत्रासाठी विमा लाटला, फळपीकाचे उत्पादन नसताना त्या क्षेत्रासाठी विमा घेतला, असे प्रकार राज्यात आढळून आले आहेत. अशा अपात्र व बनावट विम्याचे १४ हजार ५७० प्रस्ताव नामंजूर करण्यात आले असून, अर्जदारांनी विम्याच्या हप्त्यापोटी भरलेले साडेतेरा कोटी रुपये कृषी विभागाने जप्त केले आहेत. त्यामुळे बनावट विमा अनुदान लाटणाऱ्यांना चाप बसला आहे.

### अंबाबाई मंदिर परिसरात राडा; दुकानदार महिला पोलिसांना भिडल्या

**कोल्हापूर :** कोल्हापुरात साडेतीन शक्तीपीठांपैकी एक असलेल्या अंबाबाई मंदिरात शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त लगबग सुरू आहे. कोल्हापूर महानगरपालिकेच्या वतीने अंबाबाई मंदिर परिसरातील अतिक्रमण हटवण्याचे काम सध्या सुरू असून मंदिर परिसरातील भाविकांचे चप्पल ठेवण्यासाठी लावण्यात आलेले खासगी स्टॅण्ड महानगरपालिकेच्या वतीने हटवण्यात आले. यावेळी खासगी चप्पल स्टॅण्डधारक आणि महानगरपालिकेच्या अधिकारी, पोलीस यांच्यात मोठी झटापट झाल्याने परिसरात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते.

### ऐन सणासुदीत वीजग्राहकांना ’जोर का झटका’




**पुणे :** ऐन सणासुदीच्या काळात जनतेला वीजदरवाढीचा झटका सहन करावा लागणार आहे. वीज खरेदी खर्चात वाढ झाल्याने महावितरणकडून वीजबिलांत इंधन समायोजन आकार वसूल केला जाणार असून, परिणामी घरगुती वीज ग्राहकांना सप्टेंबरच्या बिलासाठी प्रति युनिट ३५ पैसे जादा द्यावे लागणार आहेत. ासंदर्भात महावितरणच्या मुख्य अभियंतांनी (वीज खरेदी) आदेश काढले आहेत. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे महावितरणकडून सप्टेंबरच्या वीजबिलात इंधन समायोजन आकार वसूल केला जाणार आहे, असे या आदेशात म्हटले आहे. महावितरणला मार्च, एप्रिल व मे महिन्यांत अल्पकालीन करार व पॉवर एक्स्चेंजद्वारे अतिरिक्त वीज खरेदी करावी लागली होती. त्याची भरपाई म्हणून सप्टेंबर महिन्याच्या वीजबिलात इंधन समायोजन आकार वसूल केला जाणार आहे, असे महावितरणमधील सूत्रांनी सांगितले.

### प्रेमाच्या नात्यातील गुंतागुंत दाखवणारा ’दिल दोस्ती दिवानगी’




**मुंबई :** नवे मित्र मैत्रिणी, नव्या ओळखी, मजामस्ती, उत्साह आणि उन्माद म्हणजे कॉलेजलाईफ. ‘दिल दोस्ती दिवानगी’ सगळं तिथं अनुभवायला मिळतं. ही सगळी धमाल आपल्याला ‘दिल दोस्ती दिवानगी या चित्रपटातून पहायला मिळाली आहे.ट्रान्स इंडिया मिडिया अँड एन्टरटेनमेन्टची प्रस्तुती असलेल्या ‘दिल दोस्ती दिवानगी’ चित्रपटाची निर्मिती राजेंद्र राजन यांची असून शिरीष राणे चित्रपटाचे दिग्दर्शक आहेत. मैत्रीच्या नात्याचा वेध आणि प्रेमाच्या नात्यातील गुंतागुंत दाखवणारा हा चित्रपट आहे. काही अनपेक्षित घटनांमुळे बदलत जाणारे नात्याचे रंग आणि प्रेमाचा प्रवास कोणत्या वळणांनी घडत जातो याची रंजक कथा ‘दिल दोस्ती दिवानगी’ हा चित्रपट उलगडतो.

### अभिनेत्री वनिता खरातचा दाक्षिणात्य अंदाज



**मुंबई :** चतुरस्त्र अभिनेत्री वनिता खरातचा मोठा चाहता वर्ग आहे. तिच्या आजवरच्या सगळ्याच भूमिकांचं त्यांनी कौतुक केलंय. आता मराठी, हिंदीनंतर ती दाक्षिणात्य चित्रपटामध्ये दिसणार असल्याची चर्चा रंगली आहे. वेगवेगळ्या धाटणीच्या भूमिकांनी प्रेक्षकांची मने जिंकणाऱ्या वनिताचा साऊथ इंडियन’ लूक नुकताच समोर आला आहे. नुकताच तिचा एक फोटो सोशल माध्यमावर शेअर करण्यात आला आहे. ती नेमकी कोणत्या चित्रपटात काम करणार आहे? हे जाणून घ्यायचा प्रयत्न केला असता, ’एकदा येऊन तर बघा’ असं म्हणत तिने रसिकांना थेट चित्रपटाचं आमंत्रण दिलं आहे. येत्या २४ नोव्हेंबरला प्रदर्शित होणाऱ्या प्रसाद खांडेकर दिग्दर्शित ’एकदा येऊन तर बघा’ या चित्रपट प्रदर्शित होणार आहे.

### ‘ज्ञानराधा’वर इन्कम टॅक्सची वक्रदृष्टी

**बीड :** बहुचर्चित कुटे ग्रुप हा जवळपास आता देशभर गाजतो आहे. त्याच माध्यमातून बीड जिल्ह्यातील हजारो नागरिकांना तरुणांना आणि तरुणींना या ग्रुपमुळे जिल्ह्यातच कामाची संधी मिळाली आहे. याच कुटे ग्रुपची ज्ञानराधा मल्टीस्टेट त्याहून आधी जुनी आहे आणि विश्वासार्हता ही कमावणारी ही बीड जिल्ह्यातील एकमेव बँक आहे. मात्र, काही दिवसांपूर्वीच या बँकेच्या अनेक शाखांमध्ये इन्कम टॅक्सची सर्वसाधारण तपासणी चालू असल्याने नागरिकांमध्ये अफवा पसरली होती. यामुळे बँकेतील ठेवीदारांमध्ये घबराट पसरली होती. अनेकांनी अफेवर विश्वास ठेवत आपल्या ठेवी काढण्यासाठी बँकेत तोबा गर्दी केली होती.

# पवार गटाचे उर्वरित आमदारही महायुतीत जाणार?

## गुप्त चर्चेबाबत शिंदे गटाच्या मंत्र्याचा मोठा खुलासा

सुराज्य/मुंबई

**काही दिवसांपूर्वी अजित पवारांसह राष्ट्रवादी काँग्रेसच्या काही आमदारांनी शिंदे-फडणवीस सरकारला पाठिंबा दिला आहे. सत्तेत सहभागी होताच अजित पवार गटाच्या नऊ आमदारांची मंत्रीपदी वर्णी लागली. अजित पवार गटाने अचानक सरकारला पाठिंबा दिल्याने महाराष्ट्राच्या राजकारणात खळबळ उडाली. पक्षफुटीनंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात दोन गट पडले आहेत. काहीही झालं तरी भारतीय जनता पार्टीबरोबर जाणार नाही, अशी स्पष्ट भूमिका राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी घेतली आहे.**



अशी एकंदरीत राजकीय स्थिती असताना शिंदे गटाचे मंत्री शंभूराज देसाई यांनी मोठा खुलासा केला आहे. शरद पवार गटातील नेते महायुतीच्या सरकारमध्ये येण्यास इच्छुक आ-हेत. संबंधित नेत्यांची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याशी चर्चा सुरू आहे. दिवाळी जवळ आली आहे, त्यामुळे धमाका सुरू झाला आहे, असा खुलासा शंभूराज देसाई यांनी केला.

प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना शंभूराज देसाई म्हणा-ले, राष्ट्रवादी काँग्रेसमधील (शरद पवार गट) काही नेते महायुतीच्या सरकारमध्ये यायला इच्छुक आ-हेत. असे बरेच लोक आहेत. आमचे दोन-तीन जे महत्त्वाचे नेते आहेत, त्यांच्याशी याबाबत अंतर्गत चर्चा सुरू आहेत. एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्याबरोबर संबंधित सगळ्या नेत्यांची चर्चा सुरू आहेत.

दिवाळी जवळ आली आहे, त्यामुळे धमाका सुरू झाला आहे. दसऱ्यातही आपण जोरदार धमाके करतो, उत्साह साजरा करतो. त्यामुळे जसं अजित पवारांच्या नेतृत्वाखाली ९ मंत्र्यांनी अचा-नक शपथ घेतली, तसंच कदाचित होण्याची शक्यता नाकारता येत नाही, असंही मंत्री देसाई यांनी पुढे नमूद केलं. शंभूराज देसाई यांच्या या दाव्यानंतर राजकीय वर्तुळात तर्क-वितर्क लढवले जात आहेत.

# चिपळूण उड्डाणपुलाचा काही भाग अखेर कोसळला



## सुदैवाने जीवितहानी टळली

सुराज्य/मुंबई

सोमवारी सकाळी ८.३० वाजण्याच्या सुमारास मुंबई-गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणाअंतर्गत चिपळूण येथे उभारण्यात येत असलेल्या पुलाचा एक गर्डर खाली कोसळला होता. मात्र, काही कालावधीनंतर उड्डाण पूलाचा काही भाग देखील खाली कोसळला आहे. पुलाचे काम करणारी क्रेन देखील पूर्णपणे खराब झाली आहे.

या पुलांतर्गत एकूण ४६ पिलर उभारल्यानंतर तात्काळ गर्डर चढविण्याचे काम सुरू करण्यात आले होते. मात्र, अचानक सोमवारी सकाळी उड्डाणपुलाचा गर्डर खचल्याने मोठा आवाज झाला. त्यानंतर थोडा वेळ काही झाले नाही. मात्र आता मात्र उड्डाणपुलाचा काही भागच खाली कोसळला आहे.

सकाळी आठ ते साडे आठच्या दरम्यान काम सुरु असलेल्या उड्डाणपुलावरील गर्डर कोसळला होता. मात्र, त्यावेळेस एवढे नुकसान झाले नव्हते. मात्र दुपारी सव्वा दोन ते अडीच वाजण्याच्या सुमार त्या उड्डाणपुलाचा काही भाग खाली कोसळला. तसेच त्यावर काम करत असणारी क्रेन देखील पूर्णपणे खराब झाली आहे.

सुदैवाने यामध्ये कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, उड्डाणपुलाचा कोसळलेला भाग उचलण्यासाठी दोन अधिक महिन्यांचा कालावधी लागू शकतो, असे रत्नागिरी सार्वजनिक बांधकाम विभागातील एका उच्चपदस्थ अधिकाऱ्याने एका खाजगी वृत्तवाहिनीशी बोलताना सांगितले.

# पुणे विद्यापीठाची मोठी कारवाई



**नाशिक :** परीक्षेतील गुण भरताना झालेल्या चुकांबाबत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामार्फत नाशिक, नगर व पुणे जिल्ह्यातील १३७ प्राध्यापकांना, तर ८० महाविद्यालयांना दंड करण्यात आला आहे. या दंडातून ११३ प्राध्यापकांना सूट दिल्याची माहिती विद्यापीठाकडून देण्यात आली. चुकांच्या गांभीर्यानुसार हा दंड करण्यात आला असून, या दंडाची रक्कम ५ लाख ३७ हजार असल्याचे निदर्शनास आले आहे.

पुणे विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्ष २०२२-२३ च्या उन्हाळी सत्राच्या परीक्षांच्या निकालात अनेक समस्या समोर आल्या होत्या. काही विषयांचे क्रेडिट्स अनेक महाविद्यालयांनी भरलेले नव्हते.

एखादा विद्यार्थी उपस्थित असताना त्याला अनुपस्थित दाखविण्यात आले होते. तसेच काही महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांचे गुण भरताना त्यात चुका केल्या होत्या. या प्रत्येक चुकीसाठी प्राध्यापकांना १ हजार रुपये, तर महाविद्यालयांना ५ हजार रुपये दंड करण्यात येणार होता.

# नागपुरातील ’किंग’सह अकरा जणांना अटक

सुराज्य/नागपूर

सोने तस्करीचे रॅकेट संपूर्ण देशात पसरले असून, नागपूर महसूल गुप्तचर संचालनायलाच्या पथकाने मुंबई व वराणसीमध्येही छापे टाकले. डीआरआने नागपुरातील व्यवहाराचा ‘किंग’ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सराफाला अटक केली. तो एका संघटनेचा पदाधिकारी असल्याचे कळते. त्याच्या अटकेनंतर सराफा व्यावसायिकांमध्ये प्रचंड खळबळ उडाली आहे.

दोन दिवसांपूर्वी डीआरआयने नागपूर रेल्वेस्थानकावर कारवाई करून राहुल (वय ३६), बाळ-राम (वय ४१) या दोघांना अटक केली. त्यानंतर किंगकडे काम करणारा नोकर भूपेशला अटक करण्यात आली.

या तस्करीची पाळेमुळे शोधण्यासाठी डीआरआयने विविध पथके स्थापन केली. तिघांची कसून चौकशी केली असता तस्करीचे नेटवर्क मुंबई व वाराणसीपर्यंत असल्याचे समोर आले.

# ‘मिंधे गटातील १० खासदारांचे विसर्जन होणार’

सुराज्य/मुंबई



‘शिवसेना (ठाकरे गट) खासदार विनायक राऊत यांनी मोठं विधान केलं आहे. शिंदे गटातील बरेच जण संपर्कात आहेत. लोकसभा निवडणुकीआधी मिंधे गटात मोठा भूकंप होणार आहे, असं विनायक राऊत यांनी म्हटलं आहे. तसेच, गद्दारांनी उद्धव ठाकरे यांना शहाणपण शिकवण्याच्या भानगडीत पडू नये’, अशी टीकाही विनायक राऊतांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर केली. ते रत्नागिरीत प्रसारमाध्यमांशी संवाद साधत होते.

राज्यातील २१ हून अधिक समाजवादी जनता परिवारातील संघटनांनी उद्धव ठाकरेंबरोबर राहण्याचा निर्धार व्यक्त केला. यावरून ज्यांनी बाळासाहेबांच्या विरोधात नेहमी भूमिका घेतली, विचार आणि कार्यपद्धतीवर आरोप केले, अशा सर्व लोकांचा कवटाळण्याचं काम ठाकरे करत आहेत,’ अशी टीका मुख्यमंत्री शिंदेंनी केली. याला विनायक राऊतांनी प्रत्युत्तर दिलं.

मुख्यमंत्र्यांचा तिळपापड होणं स्वाभाविक आहे. कारण, देशात इंडिया आघाडी ताकदवान होत आहे. लोकशाहीवादी सर्व पक्ष इंडिया आघाडीला पाठिंबा देत आहेत. समाजवादी संघटनांची ताकद उद्धव ठाकरेंकडे आल्यानं इतरांची जळफळाट होत आहे. इंडिया आघाडी २०२४ साली चमत्कार करेल, असा विश्वास विनायक राऊतांनी व्यक्त केला.

गद्दारी केलेल्या १३ खासदारांपैकी ३ लोकांना निवडणूक लढण्याची संधी मिळणार असल्याचं सांगितलं जात आहे. बाकीच्या १० जणांचं विसर्जन १०० टक्के होणार आहे. त्यांच्यातील बऱ्याचं जणांचे निरोप येत आहे. सध्या कुणाचंही नाव सांगणार नाही. पण, मिंधे गटात मोठा भूकंप होणार आहे. एप्रिल महिन्यात लोकसभेच्या निवडणुका आहेत. फेब्रुवारी महिन्यात आचारसंहिता जाहीर होण्याच्या अगोदरच हा भूकंप होईल, असा दावा विनायक राऊतांनी केली.

# तेलंगणामध्ये भाजपचे ओबीसींना प्राधान्य





सुराज्य/हैद्राबाद

सत्ताधारी भारत राष्ट्र समितीवर (बीआरएस) लोक प्रचंड नाराज आहेत. सरकारविरोधी जनमताचा फायदा भाजपलाच मिळेल. बीआरएस, काँग्रेस आणि एमआयएम यांची छुपी युती आहे. ‘बीआरएस’ तर काँग्रेसमध्ये विलीन होणार होता. पण, त्यांची बोलणी फिसकटली. हे तीनही पक्ष एकत्र असतील तर मतदारांसमोर फक्त भाजपचा पर्याय उरतो. शिवाय, काँग्रेसचे आमदार पक्ष सोडून बीआरएस’मध्ये जा-तात असा अनुभव आहे. विधानसभेतील काँग्रेसच्या १८ पैकी १२ आमदार बीआरएसमध्ये गेले होते. काँग्रेसला मत म्हणजे ‘बीआरएस’ला मत देणे असा अर्थ होतो.

तेलंगणामध्ये भाजपची सत्ता आली तर मुख्यमंत्रीपदासाठी दोन-तीन नेत्यांचा गांभीर्याने विचार केला जाऊ शकतो. संभाव्य नावाबद्दल केंद्रीय नेतृत्वासमोर आमचे मत मांडू.

तेलंगणामध्ये केसीआर यांचे अख्खे कुटुंब सत्ता उपभोगत आहे. गेल्या दहा वर्षांमध्ये लोकांना काय मिळाले? दलित बंधूंना १० लाख रुपये, बीसी बंधू व अल्पसंख्याकांना १ लाख रुपये देण्याचे आश्वासन दिले होते. शेतकऱ्यांचे १ लाखाचे कर्ज माफ केले जाणार होते. दलित व आदिवासींना अनुक्रमे ३ व २ एकर जमीन, युवकांना ३ हजारांचा दरमहा भत्ता, केजी टू पीसी शिक्षण मोफत दिले जाणार होते. यापैकी एकही आश्वासन केसीआर सरकारने पूर्ण केलेले नाही.

या सरकारच्या भ्रष्टाचाराच्या कहाण्या तर इतक्या आहेत की कल्पनाही करता येणार नाही. भ्रष्टाचारामुळे कालेश्वर धरण प्रकल्पाचा खर्च ३० हजार कोटींवरून १ लाख कोटींवर गेला आहे. इथल्या मतदारांना भाजप हाच एकमेव पर्याय आहे. ओबीसी-दलित-आदिवासींचा विकासाला भाजपने प्राधान्य दिलेले आहे. ‘परिवर्तन करा, तेलंगणाचे भाग्य बदला’, असे भाजपचे घोषवाक्य आहे.



# आष्टी रेल्वेला वाळुंज येथे भीषण आग

सुराज्य/अहमदनगर

आष्टी रेल्वेला वाळुंज (ता. नगर) जवळ आग लागली आहे. प्राथमिक माहितीनुसार पहिल्या दोन डब्यांना लागली होती ती पुढे पाच डब्यांपर्यंत पो-होचली. गाडीत गर्दी नसल्याने सुदैवाने कोणालाही इजा नाही. स्थानिक ग्रामस्थ आणि अग्निशामक दलाकडून आगीवर नियंत्रण मिळवण्याचे प्रयत्न सुरु करण्यात आले होते. आगीत रेल्वेचे मोठे नुकसान झाल्याचं समोर आलं आहे. आगीचं प्रमाण वाढल्यानंतर एकूण गार्ड ब्रेक कोच आणि चार डबे असे एकूण पाच डब्यांना आग लागली आहे. चार वाजताच्या दरम्यान आग विझवण्यात यश आलं.

अहमदनगर आणि आष्टी हा महत्त्वकांक्षी प्रकल्प आहे. या मार्गावरील रेल्वेला कोणत्या कारणामुळं लागली हे अद्याप समोर आलेलं नाही. आग कशामुळं लागली याचा शोध रेल्वे प्रशासनाकडून घेण्यात येणार आहे. दुपारी ३ वाजून २४ मिनिटांनी आग लागल्याचं समोर आलं आहे.

अग्निशमन दलाचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले असून आग विझवण्यात त्यांना ४ वाजता यश आलं. या गाडीतील प्रवासी वेळेतच खाली उतरल्यानं बचावले आहेत. सुरुवातीला दोन डब्यांना आग लागली होती त्यानंतर आगीचं प्रमाण वाढल्यावर एकूण पाच डब्यांना आग लागल्याची माहिती रेल्वेकडून देण्यात आली आहे.

# नाना पटोलेंची सरकारवर चौफेर टीका

सुराज्य/मुंबई

**राज्यात सध्या मराठा, ओबीसी, धनगर समाजाकडून आरक्षणाची मागणी केली जात आहे. ही मागणी रास्तच आहे. भाजपानं २०१४ पासून या समाजांना आरक्षण देण्याचं पोकळ आश्वासन दिलं आहे. केंद्रात व राज्यात भाजपाचे सरकार असूनही त्यांनी कोणत्याच समाजाला आरक्षण दिलेले नाही. भाजपानं या समाजाची फसवणूक केली, अशी टीका महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे.**

आरक्षणाचा प्रश्न मार्गी लावायचा असेल तर जातनिहाय जनगणना केली पाहिजे. काँग्रेस सत्तेत आल्यानंतर जातनिहाय जनगणना होईल आणि आरक्षणाचा प्रश्नही मार्गी लावेल, असा विश्वास नाना पटोलेंनी व्यक्त केला. ते टिळक भवन येथे प्रसारमाध्यमांशी संवाद साधत होते.

**फडणवीस मराठा आणि मराठा समाजाची फसवणूक करत आहेत**

मागील काही दिवसांपासून आरक्षणाचा प्रश्न पेटलेला आहे. आरक्षणावरून दोन समाजात वाद निर्माण करुन राजकीय पोळी भाजण्याचे पाप भाजपा करत आहे. ओबीसींच्या आरक्षणाला हात लावणार नाही,’ असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस नागपूरमध्ये सांगतात. तेच फडणवीस मराठा आरक्षण मीच देऊ शकतो,’ अशी वल्गणा करतात. पण, प्रत्यक्षात दोन्ही समाजाची ते दिशाभूल करत आहेत, असा आरोप नाना पटोलेंनी केला.



**मंत्रीमंडळ बैठकीत दुष्काळावर चर्चा नाही**

राज्यातील अनेक भागात कमी पाऊस पडलेला आहे. मराठवाड्यातील परिस्थिती गंभीर आहे. ७ तारखेपासून महाराष्ट्राचा दौरा करुन आम्ही परिस्थिती पाहिली. लोकांशी संवाद साधला. पिण्याचे पाणी, जनावरांचा चारा यासह अनेक प्रश्न आहेत. शेतकरी, कामगार, सर्वसामान्य लोक त्रस्त आहेत, सरकारने दुष्काळ जाहीर करावा, अशी मागणी होत आहे. पण, सरकारला त्याचे काहीच गांभीर्य नाही. दोन-तीन मंत्रीमंडळ बैठका झाल्या. मात्र, त्यात दुष्काळावर चर्चा सुद्धा झाली नाही. या येड्याच्या सरकारला जनतेचं काहीही देणेघेणे नाही, असं टीकास्त्र नाना पटोलेंनी डागलं.

**वाघनखे आणतो म्हणून जनतेच्या पैशावर...**

एक मंत्री सत्कार करुन घेण्यात मग्न आहेत. तर, दुसरे मंत्री छत्रपती शिवाजी महाराज यांची वाघनखे आणतो म्हणून जनतेच्या पैशावर लंडन पर्यटन’ करुन आले आणि स्वतःचाच सत्कार करुन घेत फिरत आहेत, अशी टीकाही नाना पटोलेंनी मंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्यावर केली.

**लोक घरातही आणि बाहेरही सुरक्षित नाहीत**

समृद्धी महामार्गावर वैजापूर येथे अपघात होऊन १२ लोकांचा मृत्यू झाला ही अत्यंत दुःखद घटना आहे. मागील ९ महिन्यात समृद्धी महामार्गावर ८६० अपघात झाले. त्यात एक हजार लोक मरण पावले आहेत, जखमींही झाले आहेत. अपघात झाले की सरकार चौकशी करण्याची घोषणा करते, अशा किती चौकशा करणार? आणि याआधी घोषणा केलेल्या चौकशांचे काय झाले? याचे उत्तर आधी द्या. या महामार्गाने कोणाची समृद्धी झाली हे सर्वांना माहित आहे. भाजपाप्रणित शिंदे सरकारच्या काळात लोक घरातही सुरक्षित नाहीत आणि बाहेर रस्त्यावर आले, तर रस्त्यावरही सुरक्षित नाहीत, अशी संतप्त प्रतिक्रिया नाना पटोलेंनी व्यक्त केली.



सोलापूर शहरात रविवारपासून नवरात्रौत्सवास प्रारंभ झाला आहे. दाजीपेठेतील व्यंकटेश नगर येथील मंडळाने तुळजाभवानी मंदिर देखावा सादर केला आहे. टिळक चौकातील नवशक्ती तरुण मंडळाने सती अनुसया देखावा सादर केला आहे. बाळीवेस येथील शक्तीपुजा नवरात्र मंडळाने वामन विष्णू अवतार देखावा सादर करुन सोलापूरकरांचे लक्ष वेधले आहे.

# ...तर धनगरी ताकद काय असते ते दाखवून देणार

## आरक्षण अंमलबजावणी प्रश्नी आ. गोपीचंद पडळकर आक्रमक

सुराज्य/सोलापूर

**डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यात न्यायालयाच्या माध्यमातून धनगर आरक्षणाचा निकाल येईल ही अपेक्षा आहे. तसे न झाल्यास जागर यात्रेच्या माध्यमातून धनगरी ताकद काय असते? हे दाखवून देणार, असा इशारा भाजपचे आ. गोपीचंद पडळकर यांनी दिला आहे. तसेच धनगर आरक्षणासाठी केवळ १० टक्के आदिवासींचा विरोध आहे. इतर ९० टक्के आदिवासींना अजून, एसटी सर्टिफिकेट मिळाले नाही. ते माळशिरस तालुक्यातील विझोरी आणि दक्षिण सोलापूर तालुक्यातील मंद्रूप येथे जागर यात्रेनिमित्त आयोजित आयोजित सभेत बोलत होते.**



### आपले 'साहेब' फक्त डॉ. बाबासाहेबच

आपण गुलामगिरीत आहोत. इंग्रजांनी या देशात जशी गुलामगिरी राबविली, तशा पद्धतीने प्रस्थापितांनीही गुलामगिरी राबविली. गुलामगिरीची काही प्रतिकं आहेत. साहेब, दादा, ताई, ताईसाहेब ही सगळी गुलामगिरीची प्रतिकं आहेत. यांना साहेब वगैरे म्हणत बसू नका. यापुढे समाजाचे एकच साहेब, ते म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर. त्यांना सोडून कुणालाही साहेब, दादा ताईसाहेब म्हणत बसू नका. तरच तुमची प्रगती होईल. हे साहेब, दादा किंवा ताईसाहेब हे सगळं बाजुला फेकून द्या. हे आपल्याला नियंत्रणात, गुलामगिरीत ठेवतात. प्रस्थापितांचा पोरगा एका दिवसात मतदारसंघाचा भाग्यविधाता होतो. पण गोरगरीब भटक्या, विमुक्तांचा ओबीसींचा मुलगा दहा–दहा वर्षे राबला तरी त्याला नेता होता येत नाही. ही काय व्यवस्था आहे, ही काय भानगड आहे? यावर आपण का विचार करीत नाही, अशी सडकून टीका आ.पडळकरांनी केली.

धनगर आरक्षणाच्या मुद्द्यावर बोलताना गोपीचंद पडळकर म्हणाले की, धनगर आरक्षणासाठी जे आदिवासी विरोध करीत आहेत, ते केवळ १० एसटी जातीतील असून, त्यांनी इतर ३३ जातींवर अन्याय केला आहे. राज्यात आदिवासींची संख्या ही एक कोटी पाच लाख इतकी असून, त्यापैकी फक्त पाच लाख लोकांनाच एसटी सर्टिफिकेटचा लाभ मिळाला आहे. आपण धनगर आरक्षणासोबत त्या ३३ आदिवासी जमातींनाही एसटी सर्टिफिकेट मिळवून देणार, त्यासाठी लढा उभारणार.

अनेक राज्यात धनगर समाजाला एसटीचे आरक्षण

राज्यातील धनगर समाज गेल्या अनेक वर्षांपासून अनुसूचित जमाती (एसटी) आरक्षणासाठी लढा देत आहे. सध्या राज्यातील धनगर समाजाला ओबीसीचे राजकीय आरक्षण आहे. मात्र, देशातील अनेक राज्यात धनगर समाजाला एसटीचे आरक्षण आहे. राज्यातील धनगड आणि धनगर या शब्दांमुळे आरक्षणाचा मुद्दा प्रलंबित असल्याचे बोलले जाते. त्यामुळे इतर राज्याप्रमाणे महाराष्ट्रातील धनगर समाजालादेखील अनुसूचित जमातीचे म्हणजेच एसटीचे आरक्षण देण्याची मागणी होत आहे. दरम्यान आता प्रकरण न्यायालयात जाऊन पोहचले आहे. यावर डिसेंबर महिन्यात सुनावणी होणार असून, यावर अंतिम निकाल येण्याची शक्यता आहे. त्यामुळे या सुनावणीकडे राज्यभरातील धनगर समाजाचे लक्ष लागले आहेत.



## पालकमंत्र्यांनी घेतले सिध्दरामेश्वर, रुपाभवानी मातेचे दर्शन

**सोलापूर :** सोलापूरची जबाबदारी स्वीकारण्यापूर्वी पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी सकाळी शहरातील विविध धार्मिक स्थळांना भेटी देऊन दर्शन घेत, मनोभावे पूजा केली. यात प्रामुख्याने सोलापुरचे ग्रामदैवत श्री सिध्दरामेश्वर मंदिर आणि ग्रामदेवी रुपभवानी देवी मंदिरात जाऊन दर्शन घेतले. सोलापूरकरांच्या आशा-आकांक्षा पूर्ण करण्यासाठी पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी प्रार्थना केली. सोमवारी त्यांनी सर्वप्रथम सोलापूरचे ग्रामदैवत आणि श्रध्दास्थान श्री सिध्दरामेश्वर मंदिरात जाऊन सिध्दरामेश्वरांच्या संजीवन समाधीचे दर्शन घेऊन पूजा केली. रुपभवानी देवीचे दर्शन घेतले. यावेळी मंदिर प्रशासनाच्यावतीने पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांचा विशेष सत्कार ही करण्यात आला. यानंतर शांतीनगर येथील श्री श्री श्री सद्गुरू बसवारूढ महास्वामीजी मठात जाऊन महाराजांच्या समाधीचे दर्शन घेतले. तसेच गुरू श्री ईश्वरानंद स्वामीजी (आप्पाजी) यांचेही आशीर्वाद घेतले. यावेळी आ. सुभाषबापू देशमुख, भाजपा शहराध्यक्ष नरेंद्र काळे, माजी शहराध्यक्ष विक्रम देशमुख, मोहन डांगरे यांच्या सह भाजपाचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

## सेवानिवृत्त शिक्षकांना देय रकमा न दिल्यास उपोषण : भरले

**सोलापूर :** राज्यातील जिल्हा परिषद सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षकांचे निवृत्तीनंतरचे रकमा दिवाळी पुर्वी नाही दिल्यास दिवाळीचा पहीला आघोंळ मुबंई मंत्रालयासमोर करण्याचा ईशारा सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षक संघाचे अध्यक्ष शिवानंद भरले यांनी राज्य शासनाला दिली आहे. राज्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षक म्हणून सेवानिवृत्त झालेल्या शिक्षकाचे नोव्हेंबर २०२२ ते आजतागायत पर्यंत देय असलेले ग्रॅज्यूटी व पेन्शन विक्री रक्कम २७-३० लाख रूपये अद्यापर्यंत दिली नाही या पुर्वी २ ऑक्टोबरला पुणेच्या शिक्षण संचालक कार्यालयासमोर धरणे आंदोलन केले तेव्हा अपुरे निधी देऊन शासन बोळवण केली अजून नोव्हेंबर २०२२ ते आजतागायत रिटायर झालेल्या जिल्हा परिषद शिक्षकाना शासन दमडी ही दिली नाही. जर दिवाळीपूर्वी रक्कम नाही दिल्यास दिवाळीची पहिला अंघोळ मुबंई मंत्रालयासमोर करण्याचा ईशारा सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षक संघाच्या वतीने दिला आहे. शिवाय राज्यातील २५००० सेवानिवृत्त शिक्षक व त्यांच्या कुटूबातील सदस्य निवडणूकीत वेगळा विचार करतील तर सेवानिवृत्ताना मिळणार्या रकमेसाठी व्याज मागणीचा न्यायालयात दाद मागणीचा ईशारा शिवानंद भरले यांनी दिला आहे.

## शाई फेकप्रकरणी भीम आर्मीच्या अध्यक्षांवर गुन्हा

**सोलापूर :** सात रस्ता येथील शासकीय विश्रामगृह येथे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्यावर शाईफेक केल्याप्रकरणी भीम आर्मीचे अध्यक्ष अजय ऊर्फ रावण संतोष मैंदर्गीकर यांच्याविरुद्ध सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. पालकमंत्री पाटील यांचा कॅनव्हा शासकीय विश्रामगृह येथे आला असता पालकमंत्री हे इमारतीची पायरी चढत असताना भीम आर्मीचे अध्यक्ष अजय ऊर्फ रावण संतोष मैंदर्गीकर (वय-२६, मातोश्री रमाबाई आंबेडकरनगर, न्यू बुधवार पेठ) यांनी पोलिसांना झटापट करून शासकीय कामात अडथळा निर्माण करत सुरक्षेचे कडे तोडून पालकमंत्र्यांच्या अंगांवर शाही टाकली. तसेच सरकार मुर्दाबाद, खाजगीकरण बंद करा, अशा घोषणा दिल्या. अशा आशयाची फिर्याद पोलीस हेड कॉन्स्टेबल जाकिर हुसेन म.मजिद शेख (नेमणूक सदर बाजार पोलीस ठाणे) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यांच्या फिर्यादीवरून अजय मैंदर्गीकर यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला. तपास पोसई लोंढे हे करीत आहेत.




पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्यावर झालेल्या शाई फेक प्रकरनानंतर सोमवारी ते महापालिकेत येणार होते. त्या पार्श्वभूमीवर पालिका आवारात पोलिसांचा तगडा बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

## उद्धव ठाकरेंकडून पक्ष कार्यकारिणीचा विस्तार

### सोलापुरातील दोघांनी केले उपनेते; अस्मिता गायकवाड, शरद कोळींची वर्णी

सुराज्य/सोलापूर

शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी पक्ष कार्यकारिणीचा विस्तार केला असून, सोलापुरातील दोन नेत्यांना उपनेते करण्यात आले आहे. त्यात युवा नेते शरद कोळी आणि महिला संघटक अस्मिता गायकवाड या दोघांचा समावेश आहे.

शिवसेनेची संघटन शक्ती वाढावी, तसेच आगामी निवडणुकींच्या पार्श्वभूमीवर पक्षवाढीस बळकटी देण्यासाठी उद्धव ठाकरे यांनी शिवसेनेच्या कार्यकारिणाचा विस्तार केला आहे. त्यात सहा नवे नेते आणि





दहा उपनेते निवडले आहेत. मातोश्रीवर रविवारी रात्री उशिरा झालेल्या बैठकीनंतर शिवसेनेच्या नव्या नेत्यांची घोषणा करण्यात आली आहे. त्यात अख्ख्या महाराष्ट्रात सोलापूर जिल्ह्याला झुकते माप मिळाले आहे. उपनेते म्हणून जिल्ह्यातील दोघांना संधी मिळाली आहे. गेल्या वर्षी शिवसेनेत प्रवेश केल्यानंतर शरद कोळी यांच्याकडे युवा सेनेचे राज्य विस्तारक या पदाची जबाबदारी देण्यात आली होती. आता त्यांना उपनेते करण्यात आले आहे. तर दुसरीकडे सोलापूर जिल्ह्यातून अस्मिता गायकवाड यांनाही उपनेतेपदाची लॉटरी लागली आहे. वास्तविक त्या गेली अनेक वर्षांपासून शिवसेनेचे काम पाहत आहेत. गायकवाड या शिवसेना महिला आघाडीच्या संघटक होत्या. आता त्यांच्या खांद्यावर राज्यभराची जबाबदारी देताना उपनेतेपदही त्यांना बहाल करण्यात आलेले आहे.

### वाढदिवशीची काळाने घातला घाला


# मैंदर्गीतील १५ वर्षीय मुलाचा अपघातात दुर्दैवी अंत

सुराज्य/अक्कलकोट

वाढदिनीच आपल्या लाडक्या मुलाचा दुर्दैवी अंत झाल्याने मैंदर्गी येथील गुत्तेदार कुटुंबियांचे दुःखाचे डोंगर कोसळले आहे.

मैंदर्गी (अक्कलकोट) येथील १५ वर्षाच्या मुलाच्या वाढदिवसादिवशीच सोमवार, दि. १६ ऑक्टोबर रोजी सकाळी सव्वानऊ वाजता मोटारसायकल व क्लुझर अपघातात दुर्दैवी अंत झाला. अपघातामध्ये दीपक सुरेश गुत्तेदार (वय-१५ वर्षे, रा.इंदिरानगर, मैंदर्गी ता. अक्कलकोट) हा मुलगा मयत झाला. फिर्याद चन्नव्या विश्वनाथ गुत्तेदार (वय-२४, रा. नागुर ता. अक्कलकोट) यांनी दिली. क्लुझर चालक लक्ष्मीपुत्र सिद्धाराम मड्डी (वय २८ रा. मु.पो. अर्जुनगी ता. अफजलपूर) याच्यावर हयगयीने वाहन चालवून मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी गुन्हा दाखल झाला.

मैंदर्गी ते दुधनी जाणाऱ्या रस्त्याच्या डाव्या डाव्या बाजूला असणाऱ्या शिव मल्हार या ढाब्याजवळील अलीकडच्या रोडवर सोमवारी सकाळी ०९-१५ वाजण्याच्या सुमारास ( एम.एच.-१९ के.५५७३) या क्रमांकाच्या मोटारसायकला समोरून येणाऱ्या क्लुझर गाडीने (के.ए.३६ एम



.६७९३) जोराची धडक दिल्याने दुचाकीवरील फिर्यादी चन्नव्या आणि पाठीमागे बसलेला मुलगा दीपक उडून बाजूला पडले. या फिर्यादीचा मामाचा मुलगा गाडीवरून खाली पडल्याने त्याच्या अंगावर क्लुझर गाडी गेल्याने तो जागीच मयत झाला. याबाबत दक्षिण पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल झाला आहे.

फिर्यादीचा मामाचा मुलगा दीपक सुरेश गुत्तेदार याचा वाढदिवस असल्याने दुधनी रोडवर शिव मल्हार या धाब्याजवळ आले असता हा भीषण अपघात झाला.दीपकला खाजगी वाहनात ग्रामीण रुग्णालय, अक्कलकोट येथे दाखल केले असता तेथील वैद्यकिय अधिकारी यांनी उपचारापुर्वीच मयत झाल्याचे घोषीत केले. अधिक तपास पोलीस करत आहेत..

## चंद्रकांत दादांवरील शाईफेकीचा कोल्हापूर भाजपकडून निषेध



**सोलापूर :** राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री आणि सोलापूरचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्यावर रविवारी सोलापूर येथे झालेल्या शाईफेकीचा कोल्हापुरात भाजपच्यावतीने तीव्र शब्दात निषेध करण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराज चौकात भाजपच्या कार्यकर्त्यांनी जोरदार निदर्शने केली. यावेळी काळे झेंडे दाखवत कार्यकर्त्यांनी पाटील यांच्या विजयाच्या घोषणा दिल्या. संबंधितांना सोलापूरमधील भाजपचे कार्यकर्ते योग्य त्या प्रकारे धडा शिकवतील असा इशाराही यावेळी देण्यात आला. भाजप महानगरचे जिल्हाध्यक्ष विजय जाधव, प्रदेश सरचिटणीस महेश जाधव, प्रदेश सदस्य राहूल चिकोडे यांनी तीव्र शब्दात या घटनेचा निषेध व्यक्त केला. लोकशाही मार्गाने मागण्या मांडण्याचा सर्वांना अधिकार आहे. परंतु अशा पध्दतीने जर कोणी वागणार असेल तर असे प्रकार खपवून घेतले जाणार नाहीत असा इशारा दिला. भाजपचे जिल्हाध्यक्ष राजवर्धन निंबाळकर, राहूल देसाई, नाथाजी पाटील यांनीही पत्राव्दारे पाटील यांच्यावरील शाईफेकीचा निषेध केला आहे.

# स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुकांचे भवितव्य लांबले?

सुराज्य/सोलापूर

- प्रशासकांमुळे माजी नगरसेवकांना निधीच नाही
- मूलभूत प्रश्न आले ऐरणीवर
- नागरिकांचा लोकप्रतिनधींवर संताप

महाराष्ट्राची पायाभरणी करणारे माजी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांचा सत्तेच्या विकेंद्रीकरणावर प्रचंड विश्वास होता. सत्ता, निर्णय घेण्याची प्रक्रिया शेवटच्या माणसाच्या हातात असावी या विचाराने त्यांनी राज्यात पंचायतराजच्या स्थापनेत महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांच्यामुळेच पंचायत समित्या, जिल्हा परिषदांच्या निवडणुकांतून पुढे कर्तृत्ववान राजकीय पिढी घडल्या मात्र, आज स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकाच होत नसल्याने शहरातील नेतृत्वामध्ये उदासिनता आहे. प्रशासकांमुळे माजी नगरसेवकांना कामासाठी निधी मिळत नाही. नागरिकांना मात्र या तांत्रिक कारणांशी काहीच देणे-घेणे नाही. रस्ते, पाणी अशा समस्यांसाठी सर्वसामान्य नागरिक माजी नगरसेवकांकडेच धाव घेत आहेत. मात्र कामे होत नसल्याने नागरिकांचा रोष माजी नगरसेवकांवर जात आहे.



प्रशासनाचा कारभार पाहण्यासाठी महापालिकांमध्ये आयुक्तांची प्रशासक म्हणून काम पाहत आहेत. गेल्या २० महिन्यांपासून सोलापूर पालिकेवर प्रशासक आहे.मात्र सदस्यांना निधी नसल्याने कामे होत नसल्याची ओरड सुरु आहे. खरे तर जिल्हा प्रशासक नेमल्यानंतर प्रभागांतील कामे थांबतात, असे नाही, पण कामे मार्गी लागण्यावर बऱ्याच मर्यादा आल्या आहेत. प्रशासकांमुळे माजी नगरसेवक आपल्या प्रभागांतील कामांसाठी थेट निधी मागू शकत नाहीत आणि त्यांना तसा निधीदेखील मिळत नाही. नागरिकांना मात्र या तांत्रिक कारणांशी काहीच देणे-घेणे नसते. पाणी, गटार, रस्ता, कचरा अशा समस्यांसाठी सर्वसामान्य नागरिक माजी नगरसेवकांकडेच धाव घेतात. महापालिकांचा कालावधी संपल्यानंतर निवडणुका चार-सहा महिन्यांत लागल्यास संबंधित नगरसेवक आपापल्या प्रभागाची देखभाल करण्यास कसूर करीत नाहीत. त्याचा निवडणुकीत फायदाच होणार असल्याने ते सढळ हस्ते कामांवर पदरमोड सढळ निधी खर्च करतात. मात्र, आता महापालिकेकडून निधी मिळत नसल्याने या सर्व माजी नगरसेकांची कोंडी झाली आहे.

### विकासकामे खोळंबली

महापालिकेच्या निधीशिवाय नागरिकांची कामे स्वस्ताच्या खिशातून करताना त्यांच्या नाकीनऊ येत आहेत. त्यामुळे साहजिकच निवडणूक लवकर लागाव्यात, यासाठी ते आपापल्या पक्षाच्या नेत्यांकडे आग्रह धरला जात आहे. महापालिकांमध्ये अधिकारी माजी लोकप्रतिनिधींना जुमानत नाहीत. मनमानी कारभार करतात, अशा तक्रारी वाढत आहेत. सोलापूर शहरातील सुरू असलेली विकासकामे खोळंबली आहेत. त्यामुळे नागरिकांचा रोष वाढत आहे.

### लोकसभेनंतरच महापालिका निवडणुका?

प्रशासकीय कारभार थांबविण्यासाठी आता निवडणु होणे गरजचे आहे मात्र, ओबीसी आरक्षणासंदर्भातील सर्वोच्च न्यायालयातील सुनावणी २८ नोव्हेंबरपर्यंत पुढे ढकलली आहे. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचे भवितव्यदेखील लांबले आहे. आता लोकसभा निवडणुकांनंतरच होण्याची शक्यता आहे.